**बिसेन डेन्टल केअर**

**डॉ.दिप(पंकज) बिसेन** **डॉ.खुशबू बिसेन(पटले)**



दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८९८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक २६ | बुधवार,दि.०१ जुन २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


## ड्रायपोर्टसाठी जागा द्या सहा महिन्यात मंजूरी देतो-गडकरी



■ दर्जेदार रस्ते व पुलांमुळे जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होणार
■ ३५० कोटीच्या कामाचे भूमीपूजन

**गोंदिया :** गोंदिया जिल्हा तांदूळ उत्पादक असून इथला तांदूळ मोठ्या प्रमाणात निर्यात होतो. त्याचे अर्थकारण कोट्यावधीचा घरात आहे. आता आलेल्या ड्रायपोर्टच्या मागणीनुसार रेल्वेच्या बाजुला अस-लेली २०० एकर जमीन दिल्यास सहा महिन्यात त्याला मंजूर करुन भूमीपूजन करण्याची घोषणा करीत खा. प्रफुल पटेलांनी यासाठी पुढाकार घ्यावे असे म्हणाले.या ड्रायपोर्टमुळे तांदळासोबतच अन्य पदार्थाच्या वाहतूकीसाठी सोय होऊन खर्च कमी होणार असल्याचे म्हणाले.

जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाचे अनेक कामे जवळपास पूर्णत्वास आली असून काही कामे सुरु झाली आहेत. त्यांचे भूमीपूजन करण्यात आले आहे. शहरातील पश्चिम भागा-तील रिंग रोडचे भूसंपादन सुरु आहे. तर मागणी झालेल्या मेडिकल कॉलेज जवळील रिंग रोडला आजच मंजूरी देत असून पुढील सहा महिन्यात त्याचे भूमीपूजन करण्यात येईल. मात्र राज्य शासनाने प्रस्तावित रिंग रोड परिसरात स्मार्ट सिटीसाठी प्रयत्न करावे. या दर्जेदार रस्ते व पुलांमुळे निश्चितच गोंदिया जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधला जाणार आहे. असे प्रतिपादन केंद्रिय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

२९ मे रोजी जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते आमगाव-गोंदिया या राष्ट्रीय महामार्ग बांधकाम, गोंदिया-बालाघाट रस्त्यावरील बसस्थानका जवळील रेल्वे क्रॉसिंगवर उड्डानपुलाचे बांधकाम व गोंदिया शहरातील हड्डीटोली रेल्वे क्रॉसिंगवर उड्डानपुलाचे एकूण ३४९.२४ कोटीच्या कामाचे भूमीपूजन करण्यात आले.

यावेळी मंचावर खासदार प्रफुल पटेल, खासदार सुनिल मेंढे, खासदार अशोक नेते, आमदार डॉ.परिणय फुके, आमदार विनोद अग्रवाल, आमदार विजय रहांगडाले, जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले, माजी आमदार सर्वश्री राजकुमार बडोले, गोपालदास अग्रवाल, केशवराव मानकर, संजय पुराम, राजेंद्र जैन, रमेश कुथे, हेमंत पटले, भेरसिंह नागपुरे, खोमेश्वर रहांगडाले, माजी नगराध्यक्ष अशोक इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना श्री गडकरी म्हणाले की, तिरोडा-गोंदिया रस्त्यावरील ६० कोटीच्या उड्डानपुलाची घोषणा आपण करीत आहोत. जिल्ह्यात देवरी-आमगाव, गोरेगाव-गोंदिया रस्ता, महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील वैनगंगा नदीवरील पुलाचे कामे जवळपास पुर्णत्वास आलेली आहेत. तर सौंदड येथे १३० कोटीच्या उड्डानपुलाचे काम प्रगतीपथावर आहे. रावणवाडी ते बालाघाट टी पॉईंट काम येत्या सहा महिन्यात सुरु होईल. जिल्ह्या-तील महामार्ग निर्मिती दरम्यान अनेक नदी-नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यात आले आहे. यात जलसंवर्धनाची अनेक कामे झाली असून मोठ्या प्रमाणात तलावांची निर्मिती करण्यात आली आहे ज्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होईल. जिल्हा प्रशासनाने मंजुरी दिल्यास पांगोली नदीचे पुनजीवन करण्यात येईल असेही ते म्हणाले.

गोंदिया जिल्हा तांदूळ उत्पादक असून इथला तांदूळ मोठ्या प्रमाणात निर्यात होतो. आता आलेल्या ड्रायपोर्टच्या मागणीनुसार रेल्वेच्या बाजुला असलेली २०० एकर जमीन दिल्यास सहा महिन्यात त्याला मंजूर करुन भूमीपूजन करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. शेतकऱ्यांनी तांदळापेक्षा तेलबियांचे उत्पादन घेतल्यास ते जास्त फायदयाचे होईल. पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉलचे वापर शासनाने हाती घेतले आहे. आता शेतकऱ्यांनी अन्नदातासह ऊर्जादाता व्हावे असे ते म्हणाले. लवकरच नागपूर ते गोंदिया मेट्रोचे काम सुरु होणार असून १ तास ५ मिनिटात वातानुकुलीत प्रवास शक्य होणार आहे. नागपूर ते गोंदिया, गोंदिया ते चंद्रपूर व चंद्रपूर ते नागपूर अशी रिंग मेट्रो असेल. यामुळे रोजगारासाठी येणे-जाणे सुलभ होईल असेही त्यांनी सांगितले.

खासदार प्रफुल पटेल म्हणाले की, जिल्ह्याच्या विकासासाठी रिंग रोड व ड्रायपोर्टची आवश्यकता आहे. ड्रायपोर्टसाठी राज्य सरकारकडून एमआयडीसीची जागा देण्यास तयार असल्याचे सांगितले.

खासदार सुनिल मेंढे यांनी पांगोली नदी पुनर्जीवित करण्याची मागणी केली. सोबतच बिरसी विमानतळावरुन गोंदिया ते पुणे व मुंबई हवाई सेवा सुरु करावी व जिल्ह्या-तील तांदूळ निर्यातीसाठी ड्रायपोर्टला मंजूरी देण्याची विनंती केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रस्ते परिवहन मंत्रालयाचे क्षेत्रीय अधिकारी राजीव सिंग यांनी केले, तर उपस्थितांचे आभार राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता नरेश बोरकर यांनी मानले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

### निवडणुक आटोपली की विकासासाठी विरोध सोडून एकत्र यायला हवे-खा.प्रफुल पटेल



**गोंदिया:** शहराचा विस्तार हळूहळू होत असून नव्या गोंदियासाठी शहराच्या चारही बाजूला रिंगरोड देऊन वाहतुकीची कोंडी सोडवली जाऊ शकते.आपणासाठी गोंदिया काही नवे शहर नाही, गोंदियाच्या तिन्हीबाजुला रिंगरोड तयार होत असून तिरोड्याकडून बालाघाटकडे जाणारा नवा रिंगरोड कटंगी गावाच्या बाजूने वैद्यकीय महाविद्यालय परिसरातून जाईल असा तयार करावे.सोबतच गोंदियाच्या औद्योगिक वसाहतीमध्ये रेल्वेलाईनला लागूनच जी २०० एकर जागा मोकळी आहे, त्या जागेवर येथील राईसउद्योगाला चालनादेण्यासाठी ड्रायपोर्ट तयार करण्यासाठी पुढाकार घ्यावे राज्यसरकारकडून ती जागा उपलब्ध करुन देण्यासाठी मी पुढाकार घेतो असे खा.प्रफुल पटेल म्हणाले. त्यापुर्वी निवडणुकीत आपण एकमेकांच्या विरोधात प्रचार करतो,काहीवेळा तर खूप काही बोलतो परंतु निवडणुका संपल्या की सर्वांनी ते विसरुन विकासासाठी एकत्र यायला हवे.आज माझी व गडकरींची गेल्या ३०-३५ वर्षापासूनची मैत्री आहे.जरी आम्ही वेगवेगळ्यापक्षात अस-लो तरी विकासाच्या मुद्यावर एकत्र आहोत. वास्तवीक मी गोंदियाच्या या कार्यक्रमाला येणार नव्हतो,परंतु गडकरींना वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायला फोन केला आणि गडकरीजी म्हणाले आपल्याला उद्या गोंदियाला जायचे आहे.तेव्हा मी म्हणाले तर राज्यसभेचा फार्म भरायचा आहे,उद्या त्याकरीता तयारी करायची आहे,तेव्हा राज्यसभेत तर तुम्ही जाणारच आहात त्यात काही अडचण नाही. परंतु आपण गोंदियाच्या कार्यक्रमाला जाऊ.त्यामुळे आज मी आलो.

पटेलांना आपली मैत्री कशी आहे हे सांगतानाच आम्ही सोबत आलो गोंदियाच्या घरी नेऊन चहानास्ता केला आणि सोबतच या आलो. आमच्या एका कार्यक्रमात राष्ट्रपती भवनात तक्रार झाली, तेव्हा विमानाची सोय गोंदियात नव्हती त्यावेळी मी गडकरीकंडे गेलो आणि त्यांना सांगितले बघा असे आहे. राष्ट्रपती महोदयांनी दौरा रद्द केला, तेव्हा गडकरींनीच राष्ट्रपती महोदयांशी स्वतःबोलून तुम्हाला उद्या गोंदियातील पटेलांच्या कार्यक्रमाला यायचेच आहे असे सांगितल्यानंतर कार्यक्रम पार पडला अशी आठवण करुन दिली.

## रुग्णवाहिका पासिंगसाठी घेतले प्रत्येकी १० हजार

### आरोग्य विभागातील घोळ चव्हाट्यावर : पुन्हा १५०० रुपये किरकोळ खर्च

**खेमेंद्र कटरे/गोंदिया:** राज्य शासन कोरोना काळात आर्थिक चणचणीत असताना देखील आरोग्य सेवेला बळ मिळावे म्हणून शासनाने जिल्ह्यात नवीन रुग्णवाहिका दिल्या. त्या रुग्णवाहिकांची पासिंग पुरवठादाराला करावयाची होती. असे असताना देखील तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी १३ वैद्यकीय अधिकाऱ्यांना पत्रव्यवहार करुन प्रत्येकी १० हजार रुपये पासिंगकरिता मागितले. उल्लेखनीय पासिंगचा खर्च जिल्हास्तरावरुन करावयाचा असताना देखील ही रक्कम रोख का घेण्यात आली, ती रक्कम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कोणत्या निधीतून दिला, असा प्रश्न उपस्थित होत आहे. रुग्णवाहिकांचे प्रत्येकी १० हजार घेतल्यानंतर आता पुन्हा एप्रिल महिन्यात सर्विसिंगच्या नावावर प्रत्येकी १५०० रुपये घेण्यात आल्यामुळे नेमका घोळ काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आरोग्य विभागाला सप्टेंबर २०२१ मध्ये एमएस फोर्स या कंपनीच्या नवीन रुग्णवाहिका सहसंचालक आरोग्य सेवा पुणेच्यावतीने उपलब्ध करुन देण्यात आल्या. सुसज्ज अशा या रुग्णवाहिकांचे वितरण प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय करण्यात आले. मात्र त्या रुग्णवाहिकेच्या नोंदणी, डिझेल व इतर बाबींच्या नावावर संबधित १३ प्राथमिक आरोग्य केंद्राकडून प्रत्येकी १० हजार रुपयाची मागणी लेखी स्वरुपात करण्यात आल्याचे पत्र हाती आले आहे. असे एकूण ३५ रूग्णवाहिकांच्या नावे प्रत्येकी १० हजार घेण्यात आल्याचे बोलले जात आहे. त्यासंबधीचे तसे पत्रच तत्कालीन प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन कापसे यांनी १५ सप्टेंबर २०२१ रोजी काढल्याचे पुरावेच हाती लागले आहेत.

वास्तविक सदर वाहन हे जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या नावे नोंदणी होत असल्याने त्यावर जो काही आरटीओ कार्यालयात नोंदणी खर्च येतो तो जिल्हास्तरावरील यंत्रणेलाच खर्च करावयाचा आहे. त्यातही ज्या १० हजाराची मागणी करण्यात आली, ते १० हजार रुपये रोख स्वरुपात मागविण्यात आले होते. त्यामुळे संबधित प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्याने ते १० हजार रुपये कुठल्या योजनेतून या कामासाठी काढून जिल्हा आरोग्य अधिकारी यांना पाठविले हा संशोधनाचा विषय ठरला आहे.

ज्या प्राथमिक आरोग्य केंद्राना या रुग्णवाहिका वितरीत करण्यात आल्या, त्यामध्ये गोंदिया तालुक्यातील दवनीवाडा, एकोडी, खमारी, आमगाव तालुक्यातील कालीमाटी, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील चान्ना बाक्टी, गोठणगाव, कोरंभीटोला, देवरी तालुक्यातील घोनाडी, गोरेगाव तालुक्यातील सोनी व तिल्ली मोहगाव, सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा व पांढरी आणि सालेकसा तालुक्याती दरेकसा प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे. ३९ रुग्णवाहिकांच्या सर्विसिंगकरीता शासनाने यवतमाळ येथील फोर्स मोटर्स डिलरची नेमणूक करत जिल्हा परिषद आवारात जाऊन त्यांना तपासणी करावयाचे होती. ती तपासणी २९ ते ३० एप्रिल दरम्यान करण्यात आली. त्यावेळी या रुग्णवाहिकेच्या वाहनचालकाकडून प्रत्येकी १५०० रुपये तपासणी शुल्काच्या नावे वसूल करण्यात आले. कोविड काळात देखील मोठ्या प्रमाणात अनियमीत कारभार झाला. त्याची देखील चौकशी झाल्यास मोठा घोळ समोर येणार आहे.

या संदर्भात उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात विच-ारणा केली असता शासकीय वाहनांच्या नोंदणीकरिता आरसी वगळता इतर कुठलाही अधिकचे अधिकचे शुल्क लागत नसल्याची माहिती दिली.सदर वाहनांची नोंद कोरोना काळात करण्यात आल्याची सांगितले.



### जुन्या रुग्णवाहिकांत १० लीटर डिझेल

**विशेष म्हणजे या प्राथमिक आरोग्य केंद्रातील जुना रुग्णवाहिका या जिल्हा परिषद कार्यालयात परत करतेवेळी अलिखित फतवा देत त्या रुग्णवाहिकेत अधिकचे १० लीटर डिझेल घालून पाठविण्यात यावे अशा सूचना देण्यात आल्याची माहिती नाव प्रकाशित न करण्याच्या अटीवर सांगितले.**

**मी जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून आता रुजू झालो. त्यामुळे काय प्रकार झाला त्याची मला माहिती नाही. तरी देखील संबंधित लिपिकाकडून काय झाले त्याची माहिती घेवून शहानिशा करण्यात येईल.**

**डॉ. नितीन वानखेडे**
जिल्हा आरोग्य अधिकारी, गोंदिया.

## राज्यसभेसाठी पाचव्यांदा प्रफुल्ल पटेल यांचा राष्ट्रवादीतर्फे अर्ज सादर



मुंबई : राज्यसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार प्रफुल्ल पटेल यांनी आज विधान भवन, मुंबई येथे आपला अर्ज सादर केला. अर्ज सादर करताना प्रफुल्ल पटेल यांच्यासोबत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि शिवसेना नेते संजय राऊत उपस्थित होते. प्रफुल्ल पटेल यांनी राज्यसभेसाठी पक्षाच्या वतीने आ-पला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.पटेलांनी उमेदवारी अर्ज सादर केला, त्यावेळी भंडारा गोंदिया जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे महत्वाचे सर्वच नेत्यांनी मुंबईत हजेरी लावली होती.

गेली ३२ वर्षे महाराष्ट्रातील जनतेच्या आणि पक्षातील नेत्यांच्या आशीर्वादानेच मी राजकारणात सतत कार्यरत आहे. यातून देशाच्या आणि राज्याच्या हिताची कामे करण्याची संधी मला मिळाली, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस प्रफुल्ल पटेल यांनी केले. महाविकास आघाडीतील तीनही पक्षांची मते आणि महाविकास आघाडी सरकारला मानणाऱ्या इतर अपक्ष सदस्यांची मते यांचा हिशोब केला तर महाविकास आघाडीचे चारही उमेदवार निवडून येण्यास कोणतीही अडचण नाही, असे प्रफुल्ल पटेल म्हणाले. महाविकास आघाडीतील आमदारांना आपले मत देताना ते मत आपल्या पक्ष प्रतोदांना दाखवून करावे लागेल. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारचे चारही उमेद-वार निवडून येतील, याची खात्री असल्याचे प्रफुल्ल पटेल म्हणाले.

प्रफुल्ल पटेल हे पाचव्यांदा राज्यसभेवर जाणार आहेत.२०००-०६,२००६-०९,२०१४-१६,२०१६-२२ असे सलग चारवेळा राज्यसभेचे खासदारपद त्यांनी भुषवले आहे.पहिली लोकसभा निवडणुक वयाच्या ३३ व्या वर्षात १९९१ ला लढवली आणि त्यात ते बहुमताने विजयी झाले.त्यानंतर १९९६ च्या लोकसभा निवडणुकीतही विजयी झाले.१९९८ मध्ये तिसर्यांदा लोकसभेत ते निवडुन गेले.त्यानंतर २००९ मध्ये लोकसभेत निवडून गेले.२००४ व २०१४ मध्ये त्यांना भाजपकडून पराभव स्विकारावा लागला होता.

## धान खरेदीवरून शेतकऱ्यांचे रास्ता रोको आंदोलन सुमारे तीन तास वाहतूक बंद

**गोंदिया :** यंदाच्या रब्बी हंगामात केंद्र व राज्य शासनाच्या जाचक अटीमुळे अद्यापही पाहिजे त्या प्रमाणात धान खरेदी सुरू झालेली नाही. सर्व जाचक अटी रद्द करून शेतकऱ्यांचे धान खरेदी करण्यात यावे, अशी मागणी सर्वच राजकीय पक्षांनी केली. मात्र अद्यापही त्याची दखल घेण्यात आली नाही. परिणामी ३० मे रोजी ओबीसी संघर्ष समिती तालुका सालेकसाच्या वतीने सालेकसा येथील बस स्थानकासमोर धान खरेदीच्या मुख्य मागणीला घेवून आंदोलन करण्यात आले. दरम्यान तीन तास शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले. यामुळे तालुका प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली.



रब्बी हंगामातील धान खरेदीसाठी करावयाची ऑनलाईन नोंदणीची मुदत ३० एप्रिल होती तर दुसरीकडे मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासूनच आधारभूत हमीभाव धान खरेदी केंद्र सुरू करणे अपेक्षित होते. मात्र मुदत संपुन शेतकऱ्यांची नोंदणी झाली तर दुसरीकडे आधारभूत केंद्र सुरू झाले नाही. या काळात नेते मंडळी सत्ता स्थापनेत व्यस्त होते. जिल्ह्या-तील अनेक शेतकऱ्यांनी धान खरेदी करीता सातबारा ऑनलाइन झाले नसल्याचे समोर आले आहे. त्यातच सध्या प्रति हेक्टरी ८ क्विंटल ची अट ठेवण्यात आलेली आहे व धानाची उपज प्रति हेक्टरी ४० क्विंटल प्रमाणे झालेली आहे. त्यासाठी प्रति हेक्टरी ८ क्विंटल ची अट रद्द करून त्या एवजी प्रति हेक्टरी ४० क्विंटल प्रमाणे करणे व धान खरेदी करण्याची अंतिम मुद्दत वाढविण्यात यावे, त्वरित धान खरेदी केंद्र सुरू करण्यात यावे, शेतकऱ्यांचे बारदाने रकमेसह परत देण्यात यावे, तसेच नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना त्वरित प्रोत्साहन अनुदान देण्यात यावा, तसेच धान खरेदीची मुदत वाढविण्यात यावी, या मागणीला घेवून हे आंदोलन करण्यात आले.

निवेदन देतेवेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बबलू कटरे, जि.प.सदस्य विमल कटरे, लक्ष्मण नागपुरे, लता दोनोडे, ग्यानिदास महाराज, गुणवंत बिसेन, शंकर मडावी, रेखा फुंडे, अनिता चुटे, विना कटरे, शैलेश बहेकार, विजय फुंडे, मनोज डोये, संजय दोनोडे, युवराज कटरे यासह मोठ्या संख्येने शेतकरी व समितीचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

### आशिष देशमुख यांचा काँग्रेस सरचिटणीसपदाचा राजीनामा

**नागपूर:**महाराष्ट्रामधून काँग्रेसने इम्रान प्रतापगढी यांना उमेदवारी दिल्यानंतर राज्यातले काँग्रेसचे नेते नाराज झाल्याचे पाहायला मिळत आहे. काँग्रेसचे सरचिटणीस डॉ. आशिष देशमुख यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. पक्षश्रेष्ठींनी बाहेरचा आणि नवखा उमेदवार लादला त्यासाठी सोनिया गांधींवर कुणाचा दबाब होता का? अशा शब्दात देशमुख यांनी नाराजी व्यक्त केली आहे.काँग्रेसमध्ये प्रवेश करताना डॉ. आशिष देशमुख यांना राज्यसभेचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र वरिष्ठांनी हे आश्वासन पाळले नसल्याने त्यांनी राजीनामा दिला आहे.

## प्रधानमंत्री व मुख्यमंत्र्यांनी साधला विविध योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद




**गोंदिया :** भारताच्या स्वातंर्त्यप्राप्तीस ७५ वर्ष पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून केंद्र व राज्य शासनाच्या वतीने देशभरात आझादी का अमृत महोत्सवांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या धतीवर शासनाने आज लाभार्थ्यांसोबत परिसंवाद कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात सकाळी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी तर दुपारी १२ वाजता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लाभार्थ्यांशी ऑनलाइन संवाद साधला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे हिमाचल प्रदेशातील सिमला येथील आयोजित राष्ट्रीय कार्यक्रमाद्वारे राज्य, जिल्हास्तरावर स्वातंर्त्य सैनिकांच्या कुटुंबियांसह १३ योजनांच्या निवडक लाभार्थ्यांशी संवाद साधला.

जिल्हास्तरावर यासाठी गोंदिया येथे पंचायत समिती सभागृहात जिल्हाधिकारी नयना गुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण, गोंदिया पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नरेश भांडारकर व कृषी विज्ञान केंद्राचे समन्वयक विशाल उबरहंडे यांच्यासह जिल्ह्यातील विविध योजनेतील लाभार्थी याप्रसंगी उपस्थित होते. लाभार्थ्यासोबतच विविध लोकप्रतिनिर्धीना या कार्यक्रमात निमंत्रित करण्यात आले होते.

या कार्यक्रमात प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, पोषण अभियान, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, स्वच्छ भारत अभियान, जलजीवन मिशन, प्रधानमंत्री स्वनिधी योजना, एक राष्ट्र एक राशन कार्ड, प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना, आयुष्मान भारत योजना, आरोग्य योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजनांमधील लाभार्थ्यांशी प्रधानमंत्री व मुख्यमंत्री यांनी संवाद साधला.

या प्रसंगी पीएम किसान सन्मान निधीचा ११ वा हप्ता देखील लाभार्थ्यांना हस्तांतरित करण्यात आला. देशातील १० कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात २१ कोटी रुपये ऑनलाईन हस्तांतरित करण्यात आले. जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतींमध्ये विविध सोशल मीडीया व्टिटर, फेसबुक, यु - ट्युब आदी चॅनेलवर हा कार्यक्रम लॉईव्ह प्रसारित करण्यात आला.

राज्य शासनाच्या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी नऊ वाजता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांशी तसेच योजनाच्या यशस्वीतेसंदर्भात लोकप्रतिनिधी व मुख्यमंत्री यांच्यामध्ये ही संवाद झाला. विविध जिल्ह्यातून लोकप्रतिनिधी व लाभार्थी यामध्ये सहभागी होते.



**मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी साधला लाभार्थीशी संवाद**

योजना केंद्राच्या असोत किंवा राज्यांच्या असोत, त्या सर्वसामान्य लोकांपर्यत पोहचण्यासाठी पक्षभेद विसरून आणि राजकारणविरहित प्रयत्न झाले पाहिजेत आणि मला आनंद व समाधान आहे की, या योजना राज्य, जिल्हा, तालुका पातळीवर प्रशासकीय यंत्रणेने नियोजनपूर्वक लाभार्थीपर्यत यशस्वीरीत्या पोहचविल्या.

**सरपंचांचा सत्कार**

विविध योजना यशस्वीपणे राबविणाऱ्या गोंदिया जिल्ह्या-तील सरपंचांचा या कार्यक्रमात जिल्हाधिकारी नयना गुंडे व मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या अजय अंबादे, कमलेश्वरी भिलावे, एस. एम. भांडारकर, तेजेंद्र हरिनखेडे, बद्रीप्रसाद दशरिया, जीवनलाल लांजे, राजेंद्र चामट, नितीन टेंभडे, सोनू घरडे व शंकरलाल टेंभडे यांचा समावेश आहे. अर्जुनी मोरगाव येथील स्वातंर्त्य संग्राम सैनिक यांच्या पत्नी कौशल्याबाई कापगते यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी विविध योजनांचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

### ओबीसी आरक्षणाकरिता इम्पिरिकल डेटा आवश्यक

नुकतेच ओबीसी आरक्षणाशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा आदेश देणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेश सरकारला दिलासा देणारा निर्णय दिला. मागासवर्ग आयोगाचा अहवाल, ट्रिपल टेस्ट अटींची पूर्तता आणि प्रभागनिहाय ओबीसी आरक्षणाची सादर केलेली मुद्देसूद आकडेवारी याचा विचार करून न्यायमूर्तींनी यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय पीठाने ओबीसी आरक्षणासह निवडणुका घेण्यास मध्यप्रदेश सरकारला मान्यता दिली. या न्यायालयाच्या निर्णयामुळे मध्यप्रदेशातील महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीमधील निवडणूका घेण्याचा मार्ग मोकळा झाला. जी अभिनंदनीय बाब आहे. पण या निर्णयाअगोदर न्यायालयाने मध्य प्रदेश सरकारला ओबीसी आरक्षणाविना निवडणुका घेण्याचा दणका न्यायालयाने दिला होता.

निकालाचे सखोल अध्ययन केल्यानंतर शिवराज सिंह चौहान यांच्या सरकारने आरक्षणाविषयी तिहेरी चाचणीचे निकष पूर्ण केल्याचा अहवाल सादर केला आणि ५० टक्के आरक्षणाच्या कमाल मयार्देचे पालन करीत या अहवालाने स्थानिक स्वराज्य संस्था निहाय आरक्षणावर भर दिल्याचे न्यायालयाने निर्देशनास आणल्यामुळे मध्य प्रदेश सरकारला अपेक्षित असलेला निर्णय दिला. ओबीसींना न्याय मिळवून देण्यासाठी मध्य प्रदेश सरकारने ओबीसी कल्याण आयोगाची निर्मिती करून ऑक्टोबर २०२१ पासूनच इम्पिरिकल डेटा संकलित करण्याचे काम सुरु केले होते. ५२ जिल्ह्यांपकी ३७ जिल्ह्यांचे दौरे करून गाव पातळीवर प्रभागनिहाय ओबीसींचा इम्पिरिकल डेटा गोळा केला. या आयोगाला पुरेसा निधी आणि कर्मचारी उपलब्ध करतानाच सरकार आणि आयोगामध्ये समन्वय कायम ठेवल्यामुळे त्याचा फायदा मध्य प्रदेशला झाला. पण या उलट आपल्या महाराष्ट्र राज्यातील महाविकास आघाडी सरकारने मागासवर्गीय आयोगाची स्थापना करण्यापासून निधी, कम'चाऱ्यांची उपलब्धता आणि इम्पिरिकल डेटा संकलित करण्यामध्ये वेळकाढूपणा केला. आणि केंद्र सरकारकडील डेटा मिळविण्यासाठी आरोपांची राळ उठवली. तसेच प्रत्येकवेळी केंद्र सरकारकडे बोट दाखविण्याचे काम केले.

राज्य मागासवर्ग आयोगाने संकलित केलेला अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर करण्याची अति घाई केली. आणि परिपूर्ण नसलेला अहवाल न्यायालयास सादर करण्यास आयोगाची संमती नव्हती तरीही दाखल केलेला अहवाल फेटाळला गेल्याने महाविकास आघाडी सरकारला ओबीसींचे आरक्षण मिळविण्यात अपयश आले. जर राज्य सरकारने मध्य प्रदेश सरकारप्रमाणे नियोजनबद्ध अहवाल तयार केला असता तर महाराष्ट्रावर आज ही नामुष्की ओढवली नसती. सर्वोच्च न्यायालयाने वारंवार चपराक दिलेली असताना अजूनही ओबीसी आरक्षणासह निवडणूका घेण्यास सर्वोच्च न्यायालय मान्यता देणार की नाही ही आशा बाळगण्यापेक्षा इम्पिरिकल डेटा सादर करून न्यायालयाकडून अपेक्षित निकाल घेणे जास्त फायदेशीर ठरू शकेल.

# वादळी वीज पडून होणाऱ्या मृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना

वीज पडणे हि नैसर्गिक घटना जगभरात सर्वच ठिकाणी होत असते. यामध्ये मनुष्य पशु आणि वित्त हानी होत असते. जगभरात तसेच भारतातसुद्धा वीज पडल्यामुळे मृत्युचे प्रमाण जास्त आहे.

वीज पडण्यापूवी जेव्हा वातावरण निर्मिती होत असते अशा वेळी जर सुरक्षिततेच्या बाबींचे पालन केले तर अशा घटनांमुळे होणाऱ्या जीवित व वित्त हानीचे रक्षण करता येऊ शकते.

मान्सुन सक्रीय होण्याच्या एक महिना अगोदर अवकाळी आणि पूर्वमौसमी पावसाच्या काळात वीज कोसळण्याचे प्रकार सर्वाधिक घडतात. पाऊस पडण्याच्या आधी आकाशात ढग जमतात आणि काही मिनिटात गडगडाटी वादळासह विजा चमकतात आणि मोठ्या आवाजासह कुठेतरी पडतात. याच कालावधीत शिवारात मशागतीची तयारी सुरु असते. त्यावेळी शेतात कामे करीत असलेल्या शेतकऱ्यांचा, शेत मजुरांचा आणि जनावरांचा वीज पडून मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटना घडतात.

एका सर्वेक्षणानुसार दरवर्षी सुमारे २५०० व्यक्तींचा मृत्यू पडल्यामुळे होत असतो. त्यामुळे वीज पडणे या घटनेला गांभीर्याने घेतले पाहिजे जेणेकरून मनुष्य पशु आणि वित्तहानीचे प्रमाण कमी करता येईल. ग्रामीण भागात वीज पडून होणारे मृत्यूचे प्रमाण हे शहरी भागापेक्षा जास्त आहे. ज्या लोकांनी वीज कोसळणे अनुभवले आहे त्यांच्या मुलाखतीतून स्पष्ट झाले कि अचानक वादळी वातावरण निर्माण झाल्यावर मोठ्या आणि उंच झाडाखाली आश्रयास उभे असताना हा धोका जास्त असतो. वीज उंचीच्या ठिकाणी कोसळते हि एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. त्यामुळे जे लोक वीज चमकत असताना झाडाच्या आश्रयाला होते. वीज पडल्यामुळे ते मृत्युमुखी पडले अथवा जखमी होतात.

सर्व नागरिकांनी बचावासाठी सूचनांचे पालन करावे आणि स्मार्ट फोन असल्यास त्यामध्ये - भारतीय उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्था पुणे (IITM) व भारतीय हवामान विभागाने विकसित केलेले दामिनी अप इंस्टॉल करावे, असे आवाहन राधाबिनोद अ. शर्मा, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, बीड यांनी केले आहे. यासाठी खालील सूचनांचे पालन करावे असे सांगितले आहे.

**अचानक आलेल्या वादळात ध्यायची काळजी :**

✻ छत्र्या कोयते, सुऱ्या, गोल्फ खेळण्याची काठी अशा धातूच्या वस्तूंची जवळ ठेवणे टाळा. विशेषतः त्यावस्तू आपल्या उंचीवर असतील तर, वीज पडतांना पाहणे किंवा ऐकणे धोकादायक असते.

✻ अचानक आलेल्या वादळाच्या वेळी झाडा जवळ असाल, तरी शरीराची रचना कशी असावी यासाठी खालीलप्रमाणे कृती पाहा.

✻ जमिनी वर बसा. दोन्ही पावले जमिनीवर ठेवा, पाय गुडघ्यात दुमडून एकमेकांना जोडा आणि त्याभोवती हातांचा विखाला घाला. हनुवटी गुडघ्यावर दाबून धरा.

✻ घराबाहेर असताना विजेपासून होणारा धोका कमी करण्यासाठी जर रीकाम्या जागेत असाल तर त्वरीत आसरा शोधा

**जर वीज पडली तर :**

तर तुमच्या आसपास अथवा कोणा व्यक्ती वर पडली तर ताबडतोब वैद्यकीय मदत मिळवा. बाधित व्यक्ती वर प्राथमिक उपचार करतांना या गोष्टींचा विचार करा.

✻**श्वासोच्छवास** – जर थांबला असेल, तर त्या तोंडावर तोंड ठेवून कृत्रिम श्वासोच्छवास द्यावा. त्यामुळे त्या व्यक्तीच्या नैसर्गिक श्वासोच्छवास सुरू होण्यास मदत होईल.

✻**हृदयाचे ठोके**– थांबले असल्यास सीपीआर (CPR) चा उपयोग करावा.

✻**नाडीचा ठोका** – चालू असेल आणि श्वासोच्छवास चालू असेल, तर इतर काही जखमा अंगावर भाजल्याच्या खुणा, हाडांच्या इजा हयाबाबत नोंद करा. दृष्टी ठीक आहे नाव ऐकू येत आहे ना व इतर हालचाली याची नोंद घ्या.

✻विजेच्या धोक्यापासून स्वत: सुरक्षित राहा व दूसऱ्यांचा बचाव करा

१) मेघ गर्जना आणि वीज, वादळ हया वेळी होत असताना हे करा आणि हे करूनका



**हे करा :**

✻ तुम्ही घराबाहेर असाल, तर त्वरीत आसरा शोधा, इमारत हा सुरक्षित आसरा आहे. पण इमारत नसेल तर तुम्ही गुहा, खड्डा किंवा खिंडी सारख्या भागात आश्रय घ्या. झाडे यासाठी कधीच सुरक्षित नसतात. उंच झाडे विजेला स्वतः कडे आकर्षित करतात.

✻ तुम्हाला आसरा मिळाला नाही. तरी परिसरातील सर्वात उंच जागा टाळा. जर जवळपास फक्त उंच झाडे असतील, तर झाडाच्या उंचीच्या दुप्पट अंतरावर यांचा जमिनीवर वाका किंवा वाकून बसा.

✻ घरातच राहा किंवा बाहेर असाल, तर घरी जा. जर वादळाची चाहूल लागली, तर अगदी गरजेचे नसेल तर बाहेर जाणे टाळा.

लक्षात ठेवा. विजेचा प्रकाश आणि आवाज यातील अंतर जितके सेकंद असेल, त्याचा तीनने भागाकार केला असता ज्या ठिकाणी कोसळली तिथेपर्यंतचे अंतर किलोमीटरमध्ये अंदाजे कळू शकते.

ह जेव्हा विजा चमकणे किंवा वादळ खूप जोरात चालू असेल तेव्हा विजेच्या सुवाहकांपासून दूर रहा. उदा. धुराडी, रेडिएटर्स, स्टोव्ह, धातूचेनळ असलेल्या जागा आणि टेलीफोन,

✻ पाण्यातून तात्काळ बाहेर या, छोटया नावेतून पाण्यातून जात असाल तर काठावर बाहेर या.

✻ जर तुम्हाला विद्युत भारित वाटत असेल, तुमचे केस उभे असतील किंवा त्वचेला मुंग्या येत असतील, तर तुमच्या वर विज कोसळण्याची शक्यता आहे. त्वरित जमिनीवर ओणवे व्हा किंवा गुडघ्यात मान घालून बसा.

**काय करूनये**

विद्युत उपकरणे चालू करून वापरू नका. जसे की-हेअर ड्रायर, विद्युत टूथ ब्रश किंवा विद्युत रेझर, जर विज तुमच्या घरावर किंवा घराजवळ कोसळली, तर तुम्हाला विजेचा धक्का बसू शकतो.

वादळात टेलिफोनचा वापर टाळा.विज टेलिफोनच्या घरावरील तारांमधुन वाहू शकते.

बाहेर असतांना धातूच्या वस्तूंचा वापर टाळा.

२) कोसळणाऱ्या विजेपासून सुरक्षित राहण्यासाठी तपशीलवार माहिती

✻ विना चमकत असतांना सर्वात सुरक्षित ठिकाण म्हणजे बंदिस्त इमारत, सहली साठीचे तंबू किंवा पडवी नाही. दुसरे सुरक्षित ठिकाण म्हणजे धातूचे बंदिस्त वाहन. जसे चारचाकी गाडी, ट्रक, व्हॅन इ. पण मोटरसायकल किंवा हलक्या छताची वाहने नाहीत. सुरक्षित इमारत म्हणजे. ज्याला भिंती, छप्पर, फरशी असे. जसे की घर, शाळा, कार्यालयाची इमारत किंवा बाजराच्या इमारती.

भक्कम छताची वाहने, जसे की चार चाकी गाडी, एस.यू.व्ही., बस, ट्रक्टर (टार पोलिनये छत असलेली किया घडी करता येत असणारी छते असलेली वाहने सुरक्षित नाहीत.) जर तुम्ही तुमच्या वाहनात आसरा घेतला असेल, तर दारे-खिडक्यापूर्ण बंद असल्याची खात्री करा. धातू असलेल्या वाहनाच्या भागाला स्पर्श करूनका.

✻ जेव्हा डोक्यावर गडद काळे ढग जमू लागतात , पहिल्यांदा वादळाचा आवाज येतो. तेव्हा सुरक्षित आसरा शोधा,

✻ उंच एकाकी झाडाखाली आसरा घेऊ नका. झाडामुळे तुम्ही कदाचित कोरडे राहाल, पण विजेमुळे होणाऱ्या हानीची शक्यता तिथेच जास्त आहे. पावसामुळे तुमचा मृत्यू होणार नाही, पण विजेमुळे होऊ शकेल. अर्धवट अवस्थेत बांधकाम झालेल्या इमारतीचा आसरा घेऊ नका.

जर तुम्हाला खरोखरच सुरक्षित इमारत किंवा वाहन मिळाले नाही, तर पुढील उपायांचा अवलंब करा.

✻पुलाखाली उभे राहून वादळ जाण्याची वाट पहा. पुलाच्या लोखंडी तुळ्या कमानींना स्पर्श करू नका, तुमच्या दुचाकी पासून दूर अंतरावर थांबा, शक्यतो कोरड्या जागेवर थांबा, पूल हा स्थापत्य शास्त्रानुसार काळजीपूर्वक बांधलेला असतो. पूल जरी जमिनी पासून उंचावर असला आणि जर त्यावर विज कोसळली, तरी विजेचा प्रवाह सुरक्षित पणे जमिनीत जातो.

एखादा पूल शोधा, पाण्यापासून दूर राहा. धातूच्या वस्तूंपासून दूर राहा. जर पुलाखाली उभे असाल, तर पाण्याच्या सतत वाढणा?या पातळीची दखल घ्या.

✻जर उच्च दाबाच्या तारा रस्त्याच्या एका बाजूकडून दुस?या बाजूकडे जात असतील तर ज्या उंच मनोऱ्यांना ह्या तारा जोडल्या असतील त्याच्या खूप जवळ जाऊ नका. कमीत कमी ५० फूट अंतर सोडा जर वीज ह्या तारांवर किंवा मनोऱ्यावर कोसळली, तर प्रवाह सुरक्षितपणे या तारातून जमिनीत या अशीच त्यांची रचना असते.

वादळ होत असतांना टाळावीत अशी ठिकाणे व घटना :वीज ही नेहमी कोणत्याही ठिकाणच्या सर्वात उंच जागेवर कोसळते. शक्यतो धातूच्या वस्तूवर-जेवढी मोठी धातूची वस्तू तेवढी वीज कोसळण्याची शक्यता जास्त. शक्यतो मोकळ्या जागेवरील किंवा डोंगराच्या उंचावरील भागात असलेल्या एकाकी झाडाचा आसरा घेणे टाळा. झाडाच्या पसरलेल्या फांद्यांखाली उभे राहणे, हे तर जास्तच धोकादायक, सर्वच प्रकारची झाडे धोकादायक असतात. जेवढे झाड उंच, तेवढा धोका अधिक. एकाकी झाडा एवढाच काही झाडांचा छोटा समूहही तेवढाच धोकादायक असतो. झाडाजवळ उभे राहिल्याने झाडावरील विजेचा झोत हा शेवटी जवळ असलेल्या व्यक्तीकडेच येतो.

**हे सुध्दा धोकादायक आहे :**

✻ जंगलासभोवती असलेली मोठी झाडे.

मोकळ्या जागेवरील असंरक्षित वास्तू. जसे की- छोटी चर्च, धान्याची कोठारे, वाळलेल्या गवताच्या गंजी, लाकडी गाड्या, निरीक्षण मनोरे, उंचवटे असलेल्या जागा. झोपडया आणि इतर आसरे..

✻ धातूचे कोणतेही भाग नसलेल्या लाकडाच्या ज्यात पाण्याचे धातूचे नळ आहेत, त्या नळांना स्पर्श करणे टाळा.

✻ झेंडा उभा करायचा खांब, दुरदर्शन ॲंटिना, नळ किया धातूची उंची कायम स्वरूपी वास्तु ह्यांच्या जवळ जाऊ नका.

✻ तळे व पाण्याचे तलाव, बहुधा ही ठिकाणे मदत मिळण्यास दुरापास्त असतात. विशेषतः साठलेल्या पाण्यात तळ्यात तरंगणारी होडी,

✻ गोल्फ कोर्स आणि इतर मैदाने इथे विजा कोसळण्याची शक्यता असते.

✻ उंच सुळके व पर्वतांच्या कडा,

✻ डोंगर माथा, दरी-पेक्षा डोंगर माथ्यावर जास्त विजा कोसळतात.

४) विजेपासून संरक्षित नसलेल्या जागा,

✻ कायम स्वरूपी धातूच्या तारांची बनवलेली कुंपणे, आधार घेण्यासाठी लावलेल्या धातूच्या नळ्या व धातूची इतर मोठी बांधकामे,

✻सायकल, मोटरसायकल उघडा ट्रॅक्टर किंवा घोडा चालवणे,

✻धातूची हत्यारे जसे की पहार, कुदळ, कऱ्हाड, खुपे, छत्र्या, धातूचे झोपाळे, बागेत बसायच्या धातूच्या खुर्चा, बाक इ.

✻उघडया मैदानावर किंवा एखाद्या असंरक्षित लहान खोलीत लोकांचे एकत्र जमणे.

✻मोटारीच्या बाहेर उभे राहणे, मोटारीतून बाहेर डोकावणे किंवा मोटारीला रेलून उभे राहणे.

✻ रोड रोलर किंवा धातूची तत्सम वाहने यांचे सानिध्य टाळावे.

**- जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड**

# नेत्यांच्या टोळ धाडीपासून समाज वाचवा !!!

पंचायत निवडणूका होणार आता ओबीसी आरक्षणाशिवाय ! तरीही २७% पदांच्या भिकेसाठी झुंबड !!! ज्या ईम्पिरीकल डेटामुळे ओबीसींचे आरक्षण गेले तो ईम्पिरीकल डेटा सुप्रीमकोर्ट केंद्र व राज्याला मागत आहे तर फडणवीस सरकार, ठाकरे सरकार, ग्रामीण विकास खाते, पंकजा मुंडे, नानाभाऊ पटोले यांनी केंद्राकडे मागितला. तो डेटा केंद्रसरकारने वरील सगळ्यांना नाकारला! मग संसदीय समितीला व सामाजिक न्याय मंत्रालयाला कसा दिला? आणि यावर ओबीसी नेते व मंर्त्यांनी काय दिवे लावले? केंद्राकडे आमच्या ओबीसीचा ईम्पिरीकल डेटा आहे (त्यांच्याच कबुलीजवाबानुसार) पण तो आम्हालाच देत नाही. त्यात आमची खाजगी माहिती आहे आणि ती आम्हाला मिळण्याचा अधिकार आहे. पण आमची खाजगी माहिती आपण आमचेपासुन लपवून ठेवली, हा गुन्हा नाही काय? उलटा चोर कोतवालको डाटे! पण बोलणार कोण व मांजराच्या गळ्यात घंटा बांधणार कोण? ही आहे आमच्या ओबीसी नेत्यांची औकात !

तेव्हा झोपा काढले आणि आता पक्षमालकाचा आदेश मिळताच ओबीसी जाती-पोटजातींचे तुकडे पाडुन लुटुन नेण्यास येत आहेत दलाल नेत्यांच्या टोळ्या! तेही एका हातात फुलेआंबेडकर दुसऱ्या हातात शाहुशिवाजी व डोक्यावर मनु हेगडेवार घेवुन धार्मिक व राजकीय पक्षांच्या आदेशाखाली बहुरूप्यांचे सोंग घेवून स्वयंघोषित नेते आपापल्या जातीत जावून थोडाफार जोडलेला समाज परत तोडुन मिळेल तो तुकडा घेवून जाण्यासाठी धुमाकुळ घालत आहेत. पदासाठी भुकेलेल्या व शत्रुंचेही झेंडे पकडण्यास आतुरलेल्या त्यात्या जातींच्या म्होरक्यांना खोटी आमिषे दाखवुन आपल्या पक्षासाठी वापरून घेत आहेत. आणि हे नेमकं निवडणुकांच्या तोंडावरच कां घडते? त्या संपल्या की मग या टोळधाडी कुठं गायब होतात ! काहीच कळत नाही . तात्पर्य, वर्षानुवर्ष चालत राहणाऱ्या या घटनांचा परिणाम

शेती लयास गेली बाबा<br>
गावं उजाड झाली<br>
माणसांच्या बाजारात<br>
तुझी औकात गेली ।<br>
नादात नौकरीच्या<br>
सारी हयात गेली<br>
लेकराच्या जिंदगीची<br>
ही काळरात्र झाली ।।

जवळजवळ ७० % शेती,शेतकरी व त्यांची शिकलेली मुलं म्हणजे ९० करोड गोरगरीबांचे भविष्य अंधारमय करण्याचा विडा उचललेल्या राजकारणाचा धंदा उध्याच्या भारताला गुलामांचा देश बनविणार याची ही चाहुल आहे!

समाजकारणाचे प्रश्न राजकारणानेच सुटतात! हा अंधविश्वास आहे! कारण ओबीसींच्या मंडलला ४० वर्ष लागलीत तर ७२ वर्षानंतरही प्रत्यक्ष लाभ मिळण्याआधिच आपले आरक्षण नष्ट होत आहे. त्यातुन फोफावलेल्या बेरोजगारीवर कायम तोडगा नाही, ३६ वर्षानंतरही धरणाचे पाणी तुमच्या शेतात नाही मग सांगा, या ७२ वर्षाच्या राजकारणाने ओबीसींचे कोणते मुलभूत सामाजिक प्रश्न सुटलेत? इथं तुमच्या भक्तीवर धंदा करणारे लाखो मंदिरं आहेत, तुमच्या भावनांचा बाजार भरविणारे हजारो आश्रमं आहेत, तुमच्या अज्ञानावर व उदासिनतेवर धंदा करणारे अनेक राजकीय पक्ष व पदपैसाप्रतिष्ठेसाठी हपापलेले नालायक नेते आहेत, तुमच्या शोषणावर व हतबलतेवर दिमाख मिरविणारे शेकडो विद्यापीठं व शिक्षणाचा धंदा करणारे प्रोफ`सर आहेत, मग सांगा, या ७२ वर्षाच्या राजकारणाने या मायाजालातुन तुम्ही मुक्त झाले काय? नाही ना ! तेव्हा सावधान! स्वत:चा स्वार्थ बाजुला ठेवुन अशा टोळधाडीपासुन स्वत:ला व समाजाला वाचवा! यातच तुमची मर्दानगी आहे!! मुठभर चिवडा- घुटभर दारूव छटाकभर पद यामध्ये नाही !! सावधान !! नाहीतर तुमची मुलं उध्या गुलामांच्या बाजारात विकल्या जातील! बाबारे, समाजात प्रत्यक्ष बदल घडतो तो सामान्य माणसामुळेच! म्हणून शहरी पांढरपेशा राजकीय दलालांच्या नादी लागु नका! गावखेड्यातली सामान्य माणसं जागवा ! तुम्ही बदला,जग निश्चित बदलेल !!

**प्रा. नामदेवराव जेंगठे**
**ओबीसी संघटना ब्रम्हपुरी**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०९१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# "सांस्कृतिक युद्ध" हाच मुक्तिचा मार्ग

सध्या ओबीसी जनगणनेच्या मुद्द्यावर काही राज्यातले नेते आक्रमक झाले आहेत तर काही राज्यातील नेते सक्रीय झालेले दिसत आहेत. २००९ ते २०११ दरम्यान पार्लमेंट या मुद्द्यावर आक्रमक झालेली होती, मात्र आता २०२१-२२ साली या मुद्द्यावर पार्लमेंट शांत करण्यात आली आहे. सत्य दडपण्यासाठी एक रस्ता बंद केला तर दुसरीकडे दहा दरवाजे उघडले जात असतात. बिहार राज्यात ओबीसी जनगणनेचा मुद्दा राजकीय पातळीवर जोर धरत आहे. केंद्रातील व बिहार राज्यातील सत्ताधारी भाजपाने अनेकवेळा ओबीसी जनगणनेच्या विरोधात उघडपणे भुमिका घेतलेली आहे. बिहार भाजपाच्या कचाट्यातील नितीशकुमारांनी ओबीसी जनगणनेच्या मुद्द्यावर आतापर्यंत केवळ सोयीची भुमिका घेतलेली होती. म्हणजे भाजपाकडून काही कारणास्तव गळचेपी होत असेल तर त्यातून सुटका करून घेण्यासाठी भाजपाला अडचणीत आणणे आवश्यक असते. अशावेळी भाजपाला मात देण्यासाठी केवळ राजकीय डावपेंच म्हणून नितीशकुमार ओबीसी जनगणनेचा मुद्दा वापरीत होते.

यापूर्वी एकदा केवळ निवडणूक जुमला म्हणूनही त्यांनी ओबीसी जनगणनेच्या मुद्द्याचा वापर केलेला आहे. ओबीसी जनगणना हा मुद्दा संघ-भाजपासाठी मृत्यूच्या दरीत ढकलणारा "कडेलोट-पॉईंट" असल्याने ते या जनगणनेला कधीच पाठींबा देणार नाहीत. संघ-भाजपावाले एकवेळ नितीश सरकार पाडतील पण ओबीसी जनगणना होऊ देणार नाहीत, याची खात्री नितीशकुमारांना आहे. त्यामुळे ते आतापर्यंत या मुद्द्याचा केवळ राजकीय वापर करीत होते. मात्र आता विरोधी पक्ष नेते तेजस्वी यादव यांनी ओबीसी जनगणनेसाठी बिहारमधून दिल्लीपर्यंत संघर्ष-यात्रा काढण्याचे जाहीर करताच नितिशकुमार खळबळून जागे झाले व त्यांना या मुद्द्यावर आक्रमक व्हावे लागले. भाजपने सरकार पाडू नये म्हणून ते आता तेजस्वी यादवशी जवळीक साधून आहेत. ओबीसी जनगणनेला आक्रमकपणे विरोध करणारा भाजप आता नाक मुठीत धरत जनगणेला पाठींबा देत आहे. प्रामाणिक ओबीसी नेते आक्रमक झालेत तर संघ-भाजपसारखे कट्टर ब्राह्मणवादीसुद्धा नाक मुठीत धरत शरण येतात, याचे हे आदर्श उदाहरण आहे. परंतू ओबीसी नेता प्रामाणिक असणे व तो ओबीसींच्या मुद्द्यांवर आक्रमक असणे, या गोष्टी सहजासहजी घडू येत नाहीत. त्यासाठी ओबीसी जनता व कार्यकर्तेही प्रामाणिक असणे आवश्यक असते.

ईकडे महाराष्ट्रातही शरद पवारसाहेबांनी ओबीसी जनगणनेचा मुद्दा उचलून धरलेला आहे. राज्यात चालू असलेल्या अटीतटीच्या राजकीय लढाईत केवळ एक डावपेंच म्हणून पवारसाहेबांनी ओबीसी जनगणनेचा मुद्दा वापरलेला असावा! तसे नसते तर, पवारसाहेबांनी बिहारप्रमाणेच महाराष्ट्रातही सर्वपक्षीय मिटींग घेतली असती. ओबीसी जनगननेच्या प्रश्नावर महाराष्ट्र सरकारने जर सर्वपक्षीय मिटिंग घेतली, तर महाराष्ट्रातील भाजपाला नाक मुठीत धरून या बैठकीला उपस्थित राहावेच लागले असते व ओबीसी जनगणनेला पाठींबा द्यावाच लागला असता. मात्र अशी वेळ येऊ नये म्हणून भाजपाने लगेच सीबीआयचे अस्त्र काढले. ओबीसी जनगणनेच्या मुद्द्यावर ताकही फुंकून पिणाऱ्या संघ-भाजपाने पवारसाहेबांच्या मुस्क्या आवळणे सुरू केले आहे. ओबीसी जनगणनेच्या मुद्द्यावर पवारसाहेबांचे तोंड बंद करण्यासाठी सीबीआयने लगेच अविनाश भोसलेंना अटक केली आहे. नाक दाबले की तोंड उघडते, असे म्हणतात. पण इथे उलटेच आहे, तोंड बंद करण्यासाठी नाक दाबले जाते.

ओबीसींचा कोणताही प्रश्न धसास लावण्यासाठी बिहार वा तामीळनाडूमधील नेते ज्या पद्धतीने आक्रमक होतात, त्याच पद्धतीने महाराष्ट्र वा इतर राज्यातील नेते आक्रमक का होत नाहीत? ओबीसींचे राजकीय आरक्षण असो की जनगणना, ओबीसींचे हे विषय केवळ तोंडी लावण्यासाठी व एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यासाठीच वापरले जातात, धसास लावण्यासाठी नाही. असे का? याचे साधे कारण हे आहे कि, "जेवढी तुम्ही उंगली तेढी कराल, तेवढेच घी निघेल" राजकारणात कोणीही कुणाला फुकट काहीच देत नाही. लोकशाहीत निवडणूकांच्या राजकारणाला महत्व आलं आणी निवडणूकात वोटबँकेला! या वोटबँका संख्येच्या व राजकीय जागृतीच्या प्रमाणात प्रभाव गाजवित असतात.

उत्तर भारतात मुख्यतः बिहार, उत्तर प्रदेश या मोठ्या राज्यांमध्ये मंडल आयोग आंदोलनाच्या पार्श्वभुमीवर ओबीसींमध्ये मोठी जागृती झाली. लालूजी व मुलायमजी या समाजवादी नेत्यांच्या नेतृत्वाखाली तेथील राज्यांमध्ये ओबीसी मोठ्याप्रमाणात संघटित झाला. परिणामी तेथे ओबीसींचे पक्ष स्थापन झालेत व सत्तेतही आलेत. परंतू बिहार व उप्र राज्यातील ओबीसी जागृती ही केवळ राजकीय जागृती होती, ती सांस्कृतिक चळवळी अभावी एकसंघ नव्हती. केवळ राजकीय जागृती जातीव्यवस्थेवर मात करू शकत नाही. जातीव्यवस्थेने प्रत्येक जातीत ब्राह्मणी वर्चस्वाचा गाभा कायम ठेवला आणी नेमका त्याचा फायदा राम मंदिर आंदोलनाने उचलला.

लालु-मुलायम यांनी आपापल्या पक्षात आपापल्या कुटुंबाचे वर्चस्व वाढवत नेले. यादव जात संख्येने जास्त असल्याने निवडून येणाऱ्यांमध्ये यादव जातीचे प्रमाण जास्त होत गेले. लालू-मुलायम या दोघांचे राजकीय पक्ष हे यादव जातींचे पक्ष आहेत, असा अपप्रचार करायला वाव मिळाल्याने ओबीसीजातींमध्ये बहुसंख्य ओबीसी जाती विरोधात अल्पसंख्य ओबीसी जाती असे जातीय धृवीकरण झाले. ज्याप्रमाणे यादव-यादवेतर धृवीकरण झाले त्याचप्रमाणे बहुजन समाज पक्षामुळे (बसपा) चमार-चमारेतर असे जातीय धृवीकरण दलित जातींमध्ये झालं. त्याचाही फायदा भाजपलाच झाला. या जातीय धृवीकरणाला राममंदिराच्या ब्राह्मणी सांस्कृतिक आंदोलनाने फोडणी दिल्याने भाजपची खिचडी शिजली आणी ते सत्तेत आलेत. सांस्कृतिक आंदोलनांमुळे हे धृवीकरण अतूट व अविभाज्य झाले आहे, त्यामुळे दलित-ओबीसींवर अनेक अन्याय-अत्याचार झाल्यावरही तेथे भाजपचीच सत्ता येत असते. बिहार व उप्र राज्ये ओबीसीबहुल असल्याने तेथूनच भाजपच्या दिल्लीतील सत्तेचा मार्ग सूकर होत असतो.

या सर्व चर्चेचा निचोड एकच आहे- आणी तो म्हणजे सांस्कृतिक युद्धात जो विजयी होईल तोच बहसंख्य होईल व तोच सर्वकष सत्ताधारी होईल. सांस्कृतिक संघर्षातून साडेतीन टक्के ब्राह्मण "बहुसंख्य' बनतात व लोकशाही मार्गाने सत्तेत येतात. प्राचिन काळात जेव्हा लोकशाही नव्हती तेव्हाही त्यांनी यज्ञ-केंद्रीत सांस्कृतिक वर्चस्व गाजविले म्हणूनच ते वर्णव्यवस्थेच्या नावाखाली सर्वकष सत्तेत राहीलेत. बुद्धाला या यज्ञकेंद्रित हिंसक संस्कृतीच्या विरोधात युद्ध पुकारावे लागले. त्यात बौद्ध विजयी झालेत म्हणूनच ब्राह्मण १००० वर्षे पराभूत जीवन जगत होते. बौद्धांच्या जागृतीचे सांस्कृतिक केंद्र असलेली बौद्ध विहारे व बौद्ध विद्यापीठे ब्राह्मणांनी राजकीय प्रतिक्रांती करून नष्ट केल्यावरच ब्राह्मणांची विजयी घोडदौड सुरु झाली. त्यानंतर रामायण-महाभारत व पुराणकथांमधून त्यांनी जे सांस्कृतिक युद्ध पुकारले त्यातूनच त्यांनी नवी जातीव्यवस्था निर्माण करून आपली ब्राह्मणी सत्ता घट्ट केली.

आजचा सांस्कृतिक संघर्ष हा इतिहासाच्या पानांवर लढविला जात आहे. २१ वेळा पृथ्वी निःक्षत्रिय करणारा व जन्मदात्या आईचे शीर उडविणारा पुरूषसत्ताक नराधम परशूराम हा त्यांच्या ब्राह्मणी संस्कृतीचा प्रेरणादायी देव आहे, शूद्र शंबुकाला जिवानिशी मारणारा राम त्यांचा आदर्श आहे, कर्णाला सूतपूत्र म्हणून अपमानित करणारा कृष्ण त्यांच्या ब्राह्मणी संस्कृतीचा तारणहार आहे. बळीराजाला पाताळात गाडणारा वामन त्यांच्यासाठी अवतार-पुरुष आहे. बहुजनांवर अन्याय-अत्याचार करणारे हे त्यांचे देव-आदर्श व अवतार त्यांनी सांस्कृतिक संघर्षातून "विजयी' घोषित केलेत व बळीराजा, शंबूक, कर्ण रावण वगैरे आपले बहुजनांचे लढवैय्ये पूर्वज पराभूत ठरविलेत, त्यामुळे आपली मानसिकताच "पराभूत-मानसिकता"घडविली गेली. म्हणून आपण आज संख्येने जास्त असूनही पराभूत जीवन जगत आहोत. ब्राह्मणी अन्याय-अत्याचारविरोधात लढण्याची प्रेरणाच आम्ही गमावून बसलो आहोत.

लढण्याची ही प्रेरणा तुम्हाला परत मिळवायची असेल तर तुम्हाला इतिहासाच्या पानांवर जाऊन आपल्या पुरा-ऐतिहासिक पुर्वजांचा गौरवशाली लढवैय्या इतिहास जागृत करावाच लागेल. ब्राह्मणांनी लादलेल्या एकतर्फी सांस्कृतीक युद्धाला आपल्या बाजूने तोंड फोडावेच लागेल. त्याची सुरूवात तात्यासाहेब महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली आहेच. या लढ्यात तात्यासाहेबांनी बळीराजा दिला व बाबासाहेबांनी शंबूक दिला आहे. संघ-भाजपाच्या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात लढण्याची प्रेरणा यातूनच मिळणार आहे.

तामिळनाडूच्या ओबीसी-बहुजन जनतेने सॉमी पेरीयारांच्या नेतृत्वाखाली अशा प्रकारचा "अब्राह्मणी सांस्कृतिक" संघर्ष केला म्हणूनच तेथे संघ-भाजपा-कॉंग्रेससारख्या ब्राह्मणी शक्ती पराभूततेचे जीवन जगत आहेत व तेथील बहुजन गेल्या ५० वर्षांपासून सन्माननीय विजयाचे जीवन जगत आहेत. मुक्ती याच पथे मिळणार आहे, अन्य मार्गच उपलब्ध नाही.

**लेखक- प्रा. श्रावण देवरे**
**मोबाईल- ८८ ३०१ २७ २७०**

## ४ जिल्ह्यात घरफोडी व मोटरसायकल चोरी करणाऱ्या टोळीला अटक

**तिरोडा :** गोंदिया, बालाघाट, भंडारा, नागपूर जिल्ह्यात मोटरसायकल चोरी करून त्याद्वारे घरफोडीचे सतत गुन्हे करणा?या टोळीला मोठ्या शिताफीने तिरोडा पोलिसांनी अटक केलेली आहे. त्यांच्याकडून आतापर्यत २ चोरीच्या मोटरसायकल जप्त करण्यात आलेल्या आहेत. सदर टोळीकडून परिसरातील बरेच गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. सविस्तर वृत्त असे की, मागील काही दिवसात तिरोडा परिसरात मोटरसायकल चोरी आणि घरफोडीच्या गुन्ह्यात वाढ झालेली होती. त्यामुळे तिरोडा पोलिसांना माहिती मिळाली की, परिसरात सक्रिय टोळी फिरत आहे. सदर टोळीच्या मागे तिरोडा पोलीस मागील एक महिन्यापासून लागलेले होते. या टोळीचे सदस्य फकीरटोली काचेवानी येथील समजले. त्यानुसार तिरोडा पोलिसांनी जनतेला सतर्क करून त्या भागात जास्त लक्ष केंद्रित केले आहे. २८ मे २०२२ रोजी संतोष चंदनलाल हरिणखेडे (वय २६) रा. मजितपूर यांनी आपली हिरो होंडा मोटरसायकल फकीरटोली-काचेवानी येथे रोडच्या कडेला उभी करून शौचास गेले. त्या दरम्यान त्यांची मोटरसायकल चोरी गेल्याची माहिती तिरोडा पोलिसांना फोनद्वारे मिळाली.

त्यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मडामे यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक योगेश पारधी यांनी सोबत पोलीस हवालदार मुकेश थेर, बावणे, नायक पोलीस शिपाई रक्षे, सवालाखे, प्रशांत कहलकर, चालक पोलीस शिपाई शेख, चोपकर, दमाहे यांनी त्या भागात लोकांच्या मदतीने शोध मोहीम सुरु केले. त्यावेळी शेतात खोलगट भागात झाडाखाली ४ व्यक्ती मोटरसायकलच्या नंबर प्लेटमध्ये खाडाखोड करताना दिसले. त्यांना घेराव करून पोलिसांनी पकडले आहे.आरोपींमध्ये (१)अजय ताराचंद कनोजे (वय २८) रा. बिरसी, (२)गोलू इसूपखा पठाण (वय ३०), (३) अनिल भट्टीलाल कुंभरे (वय ३०), (४) रोशन प्यारेलाल राऊत (वय ३५) सर्व रा. फकीरटोली-काचेवानी यांचा समावेश आहे.

# महागाईच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचा बैलगाडी मोर्चा

**गोंदिया:** वाढती महागाई, उन्हाळी धान खरेदीची मर्यादा वाढविणे व अन्य मागण्यांना घेऊन २७ मे रोजी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने माजी आमदार राजेंद्र जैन, आमदार मनोहर चंद्रिकापुरे, जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर, किसान आघाडी योगेंद्र भगत यांच्या नेतृत्वात फुलचूल येथील म. ज्योतिबा फुले चौकातुन जिल्हाधिकारी कार्यालयावर बैलगाडी मोर्चा काढून केंद्र सरकारच्या विरोधात निदर्शने केली.

केंद्रशासन महागाई रोकण्यात अपयशी ठरली आहे. जिवनावश्यक वस्तुंसह इंधन, स्वयंपाकाचा गॅस, खते, किटकनाशके यांची प्रचंड प्रमाणात भाववाढ झाली आहे.




सर्वसामान्यांचे जिने मुश्कील झाले आहे. त्यातच केंद्र सरकारने उन्हाळी धान खरेदीची मर्यादा कमी करून धान उत्पादकांवर अन्याय केला असून केंद्र शासनाने प्रति हेक्टरी ४५ क्विंटल धान खरेदीची मर्यादा वाढवुन द्यावी, जिवणावश्यक वस्तुंचे दरासह इंधन, स्वयंपाकाचा गॅस, खेते, किटकनाशके आदींचे दर कमी करावे, या मागण्यांचे निवेदन जिलहाधिकारी यांच्यामार्फत केंद्र सरकारला पाठविण्यात आले.

यावेळी जि.प.उपाध्यक्ष यशवंत गणवीर,नरेश माहेश्वरी,सभापती पुजा सेठ, रविकांत बोपचे, निरज उपवंशी, राजलक्ष्मी तुरकर, राजू एन. जैन, अशोक सहारे, डॉ. अविनाश जायस्वाल, केतन तुरकर, सुरेश हर्षे,जितेश टेंभरे, बाळकृष्ण पटले, अखिलेश सेठ, नेहा तुरकर, अनिता तुरकर, ललिता पुंडे,रजनी गौतम, सविता पटले, उषा मेश्राम, सुरेंद्र रहांगडाले, कृष्णकांत बिसेन, जगदीश बहेकार यांच्यासह राकॉचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

# शहरवासीयांसाठी धोकादायक ठरली भूमिगत गटार योजना

**गोंदिया:** शहरासाठी महत्वपूर्ण असलेल्या भूमिगत गटार योजनेचे काम सध्या जोमात सुरु आहे. या कामात कंत्राटदार कंपनीने शहरातील रस्त्यांचे वाटोळे केले असतानाच सोबतच होत असलेली लापरवाही शहरवासीयांसाठी धोकादायक बनत आहे. अशात शहरवासीयंच्या तक्रारी वाढल्या असून याबाबत मुख्यमंत्र्याकडे शिवसेनेचे जिल्हा सह संपर्क प्रमुख मुकेश शिवहरे करणार आहेत.

गटार योजनेच्या कामांतर्गत कंत्राटदार लक्ष्मी कंस्ट्रक्शन कंपनीने कित्येक ठिकाणी रस्त्यांवर खड्डे खोदण्यात आले असून ते तसेच उघड्यावर सोडण्यात आले आहेत. शिवाय तेथे बेरिकेट्स



लावले नसल्याने त्यापासून कधीही धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रकारे केलेल्या कामावर नियमित क्युरिंग केले जात नसल्याचे दिसत आहे. एकंदर निकृष्ठ दर्जाचे काम केले जात असल्याच्या तक्रारी शहरवासीयांकडून केल्या जात आहेत. यावर शिवहरे यांनी काही ठिकाणी जाऊन कामची पाहणी केली. त्यात त्यांनाही कित्येक ठिकाणी खड्डे खोदून कित्येक दिवसांपासीून तसेच सोडण्यात आल्याचे दिसले. याबाबत ३१ मे रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन याबाबत तक्रार करणार असल्याचे शिवहरे यांनी कळविले आहे.

# १२७ पैकी फक्त २७ धान खरेदी केंद्र सुरु

**गोंदिया :** रब्बी हंगामातील शासकीय धान खरेदीला यंदा केंद्र शासनाने मर्यादा घालून दिल्याने सहकारी संस्था अडचणीत आल्या असून, धान खरेदी करायची कशी, असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला आहे.धान खरेदीसाठी १०७ केंद्रांना मंजुरी मिळाली असली तरी आतापर्यंत केवळ २७ धान खरेदी केंद्र सुरूझाले आहे. धान खरेदीकडे सहकारी संस्थांनी पाठ फिरविल्याचे चित्र आहे.

जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळांतर्गत जिल्ह्यात खरीप व रब्बी हंगामात धान खरेदी केली जाते. केंद्र सरकारची एजन्सी म्हणून राज्य सरकार धान खरेदी करीत असते; पण यंदा प्रथमच केंद्र सरकारने रब्बीतील धान खरेदीसाठी मर्यादा ठरवून दिली आहे. महाराष्ट्रातील ९ धान उत्पादक जिल्ह्यांना १३ लाख ७९ क्विंटल धान खरेदीची मर्यादा ठरवून दिली आहे. गोंदिया जिल्ह्यासाठी ४ लाख ७९ हजार क्विंटल धान खरेदीची मर्यादा आखून दिली आहे.

### ६० हजारावर शेतकऱ्यांनी केली नोंदणी

**रब्बी हंगामातील धानाची शासकीय धान खरेदी केंद्रावर विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाइन नोंदणी करावी लागते. यांतर्गत जिल्ह्यातील ६० हजारावर शेतकऱ्यांनी आतापर्यंत नोंदणी केली आहे.**

### खासगी व्यापाऱ्यांना अच्छे दिन

**धान खरेदीच्या मर्यादेचा तिढा अद्यापही सुटलेला नाही. तर खरीप हंगाम तोंडावर असून, शेतकऱ्यांना पैशाची गरज आहे. त्यामुळे अनेक शेतकरी गरजेपोटी प्रति क्विंटल चारशे ते पाचशे रुपये कमी दराने खासगी व्यापाऱ्यांना धानाची विक्री करीत आहे. त्यामुळे खासगी व्यापाऱ्यांना अच्छे दिन आल्याचे चित्र आहे.**



जिल्ह्यात रब्बी हंगामात ७० हजार हेक्टरवर लागवड करण्यात आली होती. रब्बीसाठी अनुकूल वातावरण मिळाल्याने पीकदेखील भरघोस आले. कृषी विभागाने रब्बीतील धानाची हेक्टरी काढलेली उत्पादकता ४३ क्विंटल आहे. त्यानुसार जवळपास ३० लाख क्विंटल धानाचे उत्पादन होण्याची शक्यता आहे; मात्र शासनाने केवळ ४ लाख ७९ हजार क्विंटल धान खरेदीची परवानगी दिली आहे, तर एकूण १०७ धान खरेदी केंद्राचा विचार करता एका केंद्राला दोन ते अडीच हजार क्विंटल धान खरेदी करता येणार असून, हे टार्गेट एकाच दिवशी पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे केंद्रावर धान विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना परत पाठवायचे कसे, असा प्रश्न संस्थेसमोर निर्माण झाला आहे. त्यामुळे १०३ धान खरेदी केंद्रांनी धान खरेदीला सुरुवात केलेली नाही.

जोपर्यंत धान खरेदीची मर्यादा वाढवून मिळत नाही, तोपर्यंत धान खरेदी न करण्याची भूमिका या संस्थांनी घेतली आहे. त्यामुळेच आतापर्यंत केवळ चार खरेदी केंद्र सुरुझाले असून, या केंद्रांवरुन १२४९ क्विंटल धान खरेदी करण्यात आली आहे. तर लाखो क्विंटल धान अजूनही शेतकऱ्यांच्या दारात पडलेले आहे.

### खरिपाची तयारी करायची की धान विकायला जायचे?

**❒खरीप हंगाम तोंडावर असून, यंदा हवामान विभागाने मान्सून लवकर दाखल होण्याचा अंदाज वर्तविला आहे; मात्र रब्बीतील धान घरी तसाच पडला असून, खरेदी केंद्र सुरु न झाल्याने शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे. खरिपासाठी खते, बियाणे खरेदीसाठी पैशांची गरज आहे; पण रब्बी धान अद्यापही विकला नसल्याने त्यांची अडचण झाली आहे. धान विक्रीसाठी जायचे की खरिपाची कामे करायची, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे.**

### खरेदीला यंदाच मर्यादा का?

**❒दरवर्षी खरीप आणि रब्बी हंगामात शासकीय धान खरेदी केंद्रावरून खरेदी केली जाते. मग केंद्र सरकारने यंदा कुठल्या आधारावर धान खरेदीला मर्यादा घातली, हे कळण्यास मार्ग नाही. कुरघोडीच्या राजकारणात बळी मात्र शेतकऱ्यांचा जात आहे.**

# मॉडेल कॉन्व्हेंट एन्ड विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षकांचे एक दिवशीय प्रशिक्षण संपन्न



**गोरेगाव :-** स्थानीय मॉडेल कॉन्व्हेंट एन्ड विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय गोरेगाव मध्ये एकदिवसीय शिक्षक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. शिक्षणाचा एकंदर दर्जा वाढवा या दृष्किोनातून प्रशिक्षण शिबिराचे आयोजन शालास्तरावर करण्यात आले. त्यामध्ये शाळेचे संस्थापक आर. डी. कटरे, मुख्याध्यापक छाया पी. मेश्राम, सुपरवायझर क.एस डी. चिचामे व सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

या प्रशिक्षनात सहभागी झालेल्या शिक्षकामधून उत्तम कामगिरी केलेल्या शिक्षकांचे शाळेचे संस्थापक आर.डी. कटरे,मुख्याध्यापक छाया पी .मेश्राम, कु एस.डी.चिचामे,आर .बी.कांबळे यांच्या हस्ते उत्तेजनपूर्व पारितोषिक देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये आर.एम.कटरे, गणेश चौधरी,एस.एम.पारधी,कु.एस .डी. चिचामे यांनी क्रमशः प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ क्रमांक पटकावला. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून संस्थापक प्रा. आर. डी. कटरे यांनी शिक्षकांना आधुनिक शिक्षणशास्त्र, दृष्टीकोणानुसार अध्यापन करताना शिक्षकांसमोर येणा-या समस्या यांवर निराकरण करणारे मार्गदर्शन केले. कृतीमधून शिक्षणफ या दृष्टीकोनातून शाळांमध्ये अध्ययन क्षमता वाढवण्यासाठी कृती आधारित अध्ययन कार्यक्रम राबवणे आणि विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनकार्ड, अध्ययन शिडी, गणित आणि विज्ञान संच अशा साधनांच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण प्राप्त करण्याची संधी उपलब्ध करून देणे.

या उपक्रमाव्दारे विद्यार्थ्यांमध्ये योग्य कौशल्ये आणि वेग विकसित होण्याबरोबच शाळेत कृती आधारित अध्ययन-अध्यापनाची संकल्पना वाढीला लागते. असे सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन कु एस.डी.चिचामे, तर आभार आर.बी.कांबळे यांनी मानले.

# आरटीओ चेकपोस्ट ठरतोय भ्रष्टाचाराचा अड्डा-बंटी शेळकेचा आरोप




**देवरी:-** देवरीचे आर. टी. ओ. चेक पोस्ट अवैध वसुलीचे प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. या चेक पोस्ट वर कर्तव्यावर असलेल्या अधिकाऱ्यांच्या एजेंटद्वारे ट्रक, वाहन चालकांकडून अवैध वसुली करून त्यांच्या आर्थिक शोषण केला जात आहे. अशा अनेक बातम्या माध्यमांनी वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दिले. परंतु, त्यावर आळा बसेल, अशा उपाययोजना करण्यात आल्या नाही. त्यामुळे नागपूर येथील महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तथा भारतीय राष्ट्रीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव बंटी शेळके यांनी आपल्या सर्मथकांसह देवरी चेक पोस्टवर सुरू असलेल्या अवैध वसुलीला घेऊन शनिवार, २८ मेपासून आंदोलन पुकारले आहे. कार्यरत भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

राष्ट्रीय महामार्गावरील देवरी येथील आरटीओ चेकपोस्टातून दिवसभरात हजारो वाहनांची ये-जा असते. याचाच फायदा घेत काही अधिकाऱ्यांनी आपले एजेंट नेमले आहेत. त्या एजंटांकडून वाहनधारकांची लूट सुरू आहे. अवैध वसुली करून ते अधिकाऱ्यांचे खिशे गरम करीत आहेत. यासंदर्भात अनेकदा लक्ष वेधण्यात आले. परंतु, अधिकारीही याकडे दुर्लक्ष करीत असल्याने हा प्रकार नितनियम प्रमाणे सुरूच आहे. याविरोधात नागपूर येथील

**आंदोलनामध्ये पोलिस प्रशासनाद्वारा असहकार्य आणि नकारात्मक भूमिका असल्याचे आरोप लावले आहे. आरटीओ चेक पोस्टवरील गुंडागदी थांबविण्यासाठी राजस्व बुडविणाऱ्यावर कारवाईच्या आंदोलनासाठी पोलिस प्रशासनाकडून सहकार्य मिळाला नाही.**

**-बंटी शेळके**

महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तथा भारतीय राष्ट्रीय युवक कांग्रेसचे राष्ट्रीय सचिव बंटी शेळके यांनी आपल्या सर्मथकांसह एल्गार पुकारला आहे.

दरम्यान ट्रक चालक-मालकांच्या आर्थिक शोषण थांबवावा, आर.टी.ओ. दलाल मुक्त करा, गुंडागदी करून अवैध वसुली थांबवा, भ्रष्ट अधिकाऱ्यांना निलंबित करावे, कोट्यवधींचा राजस्व महसूल चोरी थांबवावी आणि शासनाने संबंधित अधिकाऱ्याच्या संपत्तीची तपासणी करून ईडीद्वारे धाड टाकून कारवाई करावी आदी मागण्या केल्या आहेत. जोपर्यंत कार्यवाही होत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार, असा इशाराही देण्यात आला आहे. या आंदोलनात भंडारा जिल्हा युवक कांग्रेस उपाध्यक्ष सोनु बैरागी, भंडारा विस युवक काँग्रेस अध्यक्ष आकाश ठवकर, उपाध्यक्ष आनंद चिंचखेडे सह विदर्भ व छत्तीसगढ. युवक काँग्रेसचे अनेक कार्यकर्तागण उपस्थित आहेत.

## पालिकेचा लाचखोर कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात

**गोंदिया:-** नगर पालिकेतील गैर कारभार हा नविन विषय नाही. पैशाशिवाय पत्ताही हलत नाही, अशी स्थिती. त्यातच (ता.२६) बाजार विभागातील निरीक्षक व सेवानवृत्त कर्मचाऱ्याला ४० हजाराची लाच स्विकारताना लाचलुचपत विभागाने जाळ्यात अडकविले. ही सापळा कारवाई आज पालिकेत करण्यात आली. मुकेश राजेंद्रप्रसाद मिश्रा (४०) व टिकाराम गुजोबा मेश्राम (६०) असे लाचखोर कर्मचाऱ्यांचे नाव आहे.

सविस्तर असे की, तक्रारदार यांना गंज बाजार गोंदिया येथील नगर परिषदेच्या मालकीचे दुकान आधीचे दुकानचालकाला चालविण्यास देऊन नगरपरिषद रेकॉर्डवर तक्रारदाराचे मुलाचे नावे करण्याकरिता नोटरी करून दिले. यावरून सदर दुकान नगर परिषद रेकॉर्डवर तक्रारदाराचे मुलाचे नावे करण्याकरिता आरोपी मुकेश राजेंद्रप्रसाद मिश्रा यांनी पंचासमक्ष नगर परिषद मुख्याधिकारी यांना या कामाकरिता ३० हजार रुपये व स्वत: करीता १० हजार रुपये दिल्याशिवाय मी तुमचे काम करणार नाही, असे सांगून ४० हजार रुपए लाचेची मागणी केली. तसेच सदर लाच सेवानवृत्त कर्मचारी टिकाराम मेश्राम यांच्याकडे देण्यास सांगितले. लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने तक्रारदाराने याची तक्रार लाचलुचपत विभागाकडे केली. या प्रकरणाची शहनिशा करून (ता.२६) सापळा कारवाई करण्यात आली. तर मुकेश राजेंद्रप्रसाद मिश्रा यांचा शोध सुरू आहे. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात आरोपीविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# तिरोडा पंचायत समितीची पहिलीच मासिक सभा गाजली

**तिरोडा:** पंचायत समितीची पहली मासिक सभा कोरोना काळ संपल्यानंतर व निवडणूक होऊन पांच महिन्यानंतर झाली. लोकहितासाठी अधिकारी व कर्मचीतयांना पंचायत समितीचे उपसभापती हुपराज जमईवार यांनी चांगलेच धारेवर धरत ही सभा गाजवली.

या वेळी अध्यक्षस्थानी सभापती कुंता पटले होत्या. उपसभापती हुपराज जमईवार यांची प्रमुख उपस्थिती व सर्व सदस्य यांच्या सहभागातून ही मासिक सभा पार पडली. सभागृहात विविध विभागाचा आढावा घेण्यात आला.यात आरोग्य, महाराष्ट्र राज्य परिवहन, तहसील, पाटबंधारे उपविभाग, शिक्षण, पशुसंवर्धन, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा, बांधकाम प्रधानमंत्री आवास, रमाई, शबरी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत मिशन, पंचायत समाज कल्याण, एकात्मिक बालविकास, लघु सिचंन पाटबंधारे, जिल्हा परिषद बांधकाम, लेखाविभाग, बांधकाम, ग्रामीण पाणी पुरवठा, कृषी, महिला आर्थिक विकास महामंडळ, म.रा.ग्रा.जि.अ. यांनी आपल्या विभागाचा आढावा व योजनेची माहिती दिली.

सभेला गैरहजर असलेल्या सामाजिक वनिकरण, वन विभाग, विद्युत, तालुका कृषी अधिकारी, तालुका भुमिअभिलेख, सहायक अभियंता साबां तिरोडा यांना सभेत गैरहजर असल्याने कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार आहे, तसा ठराव पारित करण्यात आला. रोजगार हमी योजना व प्रधानमंत्री घरकुल, बांधकामच्या अभियंत्यांना चांगली समजुत देत "सुधर जाव'चा इशारा देण्यात आला आहे. सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना जनसामान्य नागरिकांना योजनांची माहिती द्यावी व कामे वेळेवर करण्यासाठी ताकीद दिली.सन २०१६-१७ ते २०२१-२२ प्रधानमंत्री आवास योजना सर्च कि जनरेट न झालेले व दुसऱ्या गावात सर्च कि जनरेट झालेल्या लाभार्थ्याचे मस्टर मजूरीचे पैसे निघाले नसल्याचे सभागृहात मुद्दा उपसभापती हुपराज जमईवार यांनी उपस्थित केला. यात सर्च जनरेट न झालेले १११७ लाभाथी व दुसऱ्या गावात जनरेट झालेले ९५८ लाभार्थी असे एकूण २०७५ लाभार्थ्यांना मजुरीचे पैसे घरकुल धारकांना मिळाले नाही. यावर आतापर्यत कसलीही



कार्यवाही करण्यात आली नाही. यातील काही लाभार्थ्यांचा मुत्यु सुद्धा झाला आहे. यावर प्रशासन किती गंभीर आहे यावरून पाहवयास मिळाले. सर्व चूक कनिष्ठ अभियंता व संगणक ऑपरेटर यांची आहे. अधिकाऱ्यांचे वचक नसल्याने, गांभीर्याने लक्ष दिले नाही. असे बोलून लाभार्थ्यांना कधी पैसे मिळणार? असा प्रश्न देखील उपसभापती जमईवार यांनी उपस्थित केला. त्यावर अधिकारी सभागृहात उत्तर देऊ शकले नाही.

सभागृहात महिला कक्ष, महिला कर्मचारी व इतर महिलांसाठी स्वतंत्र शौचालय व लघुशंकाघर नाही. पुरुष कर्मचाऱ्यांसाठी सुद्धा योग्य शौचालय नाही. या असुविधांवर लक्ष केन्द्रित करून उपसभापती जमईवार यांनी सभापती, उपसभापती यांच्यासाठी स्वतंत्र कार्यालय व पंचायत समिती इमारतीची रंगरंगोटी करण्याचा ठराव मांडला. हे सर्व ठराव मंजूर करण्यात आले.

# ३०० रुपयांत गणवेश, ही तर थट्टाच

**गोंदिया:** समग्र शिक्षा अभियानांतर्गत जिल्ह्यातील ७४ हजार ९४५ विद्यार्थ्यांना शाळा सुरु होताच पहिल्याच दिवशी दोन गणवेश मिळणार आहेत. यासाठी राज्य शासनाने ४ कोटी ४९ लाख ६७ हजार रूपये इतका निधी वितरित केला आहे. परंतु वर्षभरारतील महागाईचा वाढता आलेख पाहता एका गणवेशासाठी ३०० रुपये पुरतील काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेश योजनेसाठी जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणारे इयत्ता पहिली ते आठवीतील सर्व मुली, सर्व मागासवर्गीय मुले आणि दारिद्र्यरेषेखालील मुले पात्र आहेत. दरवर्षी दोन गणवेश मोफत दिले जातात. इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेशित तसेच शाळेत नव्याने प्रवेश घेतलेल्या निकषपात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना दोन संच गणवेशाचे वाटप करण्याचे व या योजनेपासून लाभार्थी वंचित राहणार नाहीत. याची दक्षता घेण्याचे निर्देश राज्य प्रकल्प संचालकांनी दिले आहेत. त्यानुसार शिक्षणाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या गट



### तालुकास्तरावरुन समितीला निधी

**शाळा व्यवस्थापन समित्यांना पंचायत समिती स्तरावरुन निधी वितरित करण्यात येणार आहे. गणवेशवाचे रंग, प्रकार, स्पेशिफिकेशन ठरविण्याचे अधिकार शाळा व्यवस्थापन समितीला दिले आहेत. याबाबत राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर निर्णय घेण्यात येऊ नयेत, अशा सुचना आहेत. गणवेश खरेदी देयकाची अदायगी शाळा व्यवस्थापन समितीने धनादेशाद्वारेच करण्याचे आदेश असल्याची माहिती सहाय्यक कार्यक्रम अधिकारी दिलीप बघेले यांनी दिली.**

शिक्षणाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत.

जिल्ह्यात इयत्ता पहिली ते आठवीचे गणवेशाकरिता पात्र विद्यार्थी ७४ हजर ९४५ विद्यार्थी आहेत. त्या विद्यार्थ्यांना दोन गणवेशाकरिता ४ कोटी ४९ लाख ६७ हजार रुपयांची मागणी समग्र शिक्षा विभागाने शासनाकडे केली होती. तो निधी समग्र शिक्षा विभागाला वळता करण्यात आला आहे. शिक्षण विभागाने गणवेशाचा निधी पंचायत समित्यांना पाठविला. शाळा सुरु होण्याकरिता वेळ शिल्लक आहे. त्यातच निधी धडकल्यामुळे योग्य नियोजन केल्यास शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना दोन गणवेश मिळणार आहेत. गेल्या दोन वर्षापासून कोरोना विषाणूचे संकट होते. त्यानंतर आता युक्रेन रशिया युद्धाचा देखील परिणाम झाल्यामुळे महागाई दिवसेंदिवस वाढत चालली आहे. बाजारात कपडे ४० टक्क्यांनी महागले आहेत. अशात शासनाने प्रतिगणवेश ३०० रुपये दिले असून एवढ्या कमी पैशांत गणवेश कसा काय तयार होणार, असा सवाल देखील उपस्थित होत आहे.

### काय म्हणते आकडेवारी?

| तालुका | मुली | एससी मुले | एसटी मुले | बीपीएल मुले | एकूण लाभार्थी | एकूण निधी |
|---|---|---|---|---|---|---|
| अर्जुनी मोरगाव | 4153 | 682 | 128 | 2309 | 8272 | 4963200 |
| आमगाव | 3862 | 273 | 299 | 3345 | 7779 | 4667400 |
| देवरी | 3210 | 313 | 1780 | 1205 | 6508 | 3904800 |
| गोंदिया | 9716 | 1097 | 934 | 7268 | 19015 | 11409000 |
| गोरेगाव | 4007 | 411 | 593 | 2892 | 7903 | 4741800 |
| सालेकसा | 3302 | 207 | 663 | 2328 | 6500 | 3900000 |
| स. अर्जुनी | 3739 | 420 | 801 | 2467 | 7427 | 4456200 |
| तिरोडा | 5717 | 650 | 507 | 4667 | 11541 | 6924600 |
| एकूण | 37706 | 4053 | 6705 | 26481 | 74945 | 44967000 |

### दोन गणवेशासाठी हवेत किमान हजार रुपये

**मोफत गणवेश योजनेंतर्गत सुरुवातीला दोन गणवेशाकरिता ४०० रुपये निधी मिळत होता. त्यानंतर या निधीत २०० रुपयांची वाढ करण्यात आली. कोरोनानंतर जनजीवन सुरळीत होत असतानाच महागाईचा फटका सर्वांनाच सहन करावा लागत आहे. यातच इंधन दरात आणि मालवाहतुकीमध्ये तसेच कापड निर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमती, जीएसटी दर वाढल्याने कपड्यांच्या किमती ४० टक्के महाग झाल्या. गणवेशासाठी मिळणारा ६०० रुपयांचा निधी तोकडा असून वाढत्या महगाईनुसार दोन गणवेशासाठी किमान एक हजार रुपये निधी अपेक्षीत आहे. परंतु या बाबीकडे लोकप्रतिनिधी आणि शासनाचे दुर्लक्ष आहे.**

# जिल्ह्यात ८ हजार विद्यार्थ्यांचे बोगस आधार कार्ड

**गोंदिया :** सरल प्रणालीअंतर्गत इयत्ता पहिली ते बारावीच्या मुलांची स्टुडंट पोर्टलवर आधार नोंदणी केली जाते. यंदा पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांची सरल प्रणालीअंतर्गत स्टुडंट पोर्टलमध्ये आधार क्रमांकानुसार नोंदणी झाल्यानंतर पडताळणीत राज्यभरात जवळपास २४ लाख विद्यार्थी बोगस आढळले आहेत. गोंदिया जिल्ह्यातील आठ हजार २७८ विद्यार्थ्यांचे आधार कार्ड डबल दाखवत असल्याने हे विद्यार्थी बोगस आहेत काय, याचा शोध घेण्याचे पत्र गोंदिया जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. हे जर बोगस विद्यार्थी म्हणून समोर आले तर शिक्षकांना अतिरिक्त व्हावे लागणार आहे. जिल्ह्यात इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत गोंदिया जिल्ह्यात तीन लाख ९६ हजार ३५३ विद्यार्थी आहेत.

या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड सरल प्रणालीमध्ये अद्ययावत करताना आठ हजार २७८ विद्यार्थ्यांची दुबार नोंदणी सरल प्रणालीवर झाली असल्याने हे विद्यार्थी बोगस तर नाहीत ना, असा सवाल केला जात आहे.

**जिल्ह्यात तीन लाख ९६ हजार ३५३ विद्यार्थ्यांची नोंदणी**

❍अनेक विद्यार्थ्यांचे आधार कार्ड दोनदा नोंदणी झाल्याने ते विद्यार्थी किती आहेत याची निश्चित नोंद शिक्षण विभागाच्या पुढे आली नाही.

❍एकदा विद्यार्थिसंख्येचा आकडा पुढे आल्यावर तुकडी चालविण्याची संख्या तयार होते किंवा नाही ते तपासल्यानंतरच शिक्षक अतिरिक्त होणार किंवा नाही हे पुढे येईल. जिल्ह्यात तीन लाख ९६ हजार ३५३ विद्यार्थ्यांची नोंदणी आहे.

सर्वात जास्त डुप्लिकेट गोंदिया शहरात

❍सर्वात जास्त बोगस विद्यार्थी गोंदिया तालुक्यात असून, त्याची आकडेवारी एक हजार ८८५ आहे. जिल्ह्यात सर्वाधिक संख्या गोंदियात आहे.

### अतिरिक्त होणाऱ्या शिक्षकांचे समायोजन

**विद्यार्थी बोगस आढळल्यास शिक्षक अतिरिक्त होतील. परिणामी त्या अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात येईल. शासनाच्या आदेशानुसारच शिक्षण विभाग काम करेल.**



**३० सप्टेंबरच्या उपस्थितीनुसार पटसंख्या निश्चित होईल. दुबार आधार कार्ड कुठे कुठे देण्यात आले त्याची तपासणी सुरू आहे. मागच्या आठवड्यात गटशिक्षणाधिका?यांना सूचना देण्यात आल्या आहेत. अजूनपर्यत अहवाल आला नाही. अहवाल आल्यावर तो शिक्षण विभागाला पाठविण्यात येईल.**

**- कादर शेख**
**प्राथमिक शिक्षणाधिकारी, जि.प. गोंदिया**

**एक हजार बोगस नावे डिलीट**

❍सरल प्रणालीअंतर्गत इयत्ता पहिली ते बारावीच्या मुलांची स्टुडंट पोर्टलवर आधार नोंदणी केली जाते. यंदा पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांची सरल प्रणालीअंतर्गत स्टुडंट पोर्टलमध्ये आधार क्रमांकानुसार नोंदणी करण्यात आली.

❍गोंदिया जिल्ह्यातील आठ हजार २७८ विद्यार्थ्यांचे आधार कार्ड अपडेट नव्हते. यापैकी एक हजार बोगस नावे डिलीट करण्यात आली आहेत.

# स्वत:वर भरोसा ठेवा,तुमचे जीवन प्रकाशमान होईल-प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

- कोरोनामुळे अनाथ झालेल्या ११ बालकांना १५ लाखाच्या पॅकेजचे वितरण
- प्रयोजकता योजनेत २ हजाराची वाढ
- प्रधानमंत्री यांचा मुलांशी संवाद
- गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन




**गोंदिया :** कोरोना या महामारीची जगातील प्रत्येक देशाला झळ बसली आहे. या संकटाच्या काळात केंद्र सरकार देशवासियांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. असे असतांना सुद्धा काही बालकांना आपले माता-पिता गमवावे लागले. अशा सर्व बालकांच्या पाठीशी देशाची संवेदना आहे. तुमचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी देश आपल्या पाठीशी आहे. स्वतः वर भरोसा ठेवा तुमचे जीवन प्रकाशमान होईल असा भरोसा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिला.

कोरोना महामारीमध्ये ज्यांचे आई-वडील मृत्युमुखी पडले अशा अनाथ बालकांसोबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज एका विशेष कार्यक्रमात ऑनलाईन संवाद साधला. गोंदिया जिल्ह्यात दोन्ही पालक गमावलेल्या बालकांची संख्या ११ असून जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात या बालकांना पंधरा लाखाचे पॅकेज हस्तांतरित करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी नयना गुंडे, जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते, सहायक प्रकल्प अधिकारी समा मिश्रा, बाल न्याय मंडळ सदस्य अँड. मेघना भंगणे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन गोबाडे, रेखा बघेले, मुकेश पटले व रवींद्र टेंभुर्णे जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित होते.

केंद्र व राज्याच्या महिला व बालकल्याण विभागामाफ`त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. जिल्हाधिकारी कार्यालयात येथे जिल्हाधिकारी नयना गुंडे यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत बालकांना यासंदर्भातील दस्तऐवज प्रदान करण्यात आले. यात पीएम केअर फॉर चिल्ड्रन फंड ङ्ग योजनेत १० लाख रुपये व ५ लाख रुपये किंमतीचे हेल्थ कार्डचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनाने या मुलांच्या नावे यापूर्वीच पाच लक्ष रुपयांचे मुदत ठेव प्रमाणपत्र वितरित केले आहे.

आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात हा कार्यक्रम झाला. सर्वप्रथम केंद्रीय महिला व बालकल्याण मंत्री स्मृती इराणी यांनी नवी दिल्ली येथून उपस्थितांना कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी उपस्थित बालकांशी संवाद साधला. चांगल्या पुस्तकांशी मैत्री करा, फिट इंडिया अभियानात सहभागी व्हा, योग जीवनाचे अंग बनवा असा सल्ला त्यांनी बालकांना दिला. अनाथ बालकांसाठी असलेल्या प्रयोजकता योजनेचा निधी दोन हजार रुपये प्रति माह होता आता तो चार हजार रुपये करण्यात येत असल्याची घोषणा प्रधानमंर्त्यांनी या कार्यक्रमात केली.

कोरोना महामारीमुळे आपले आई-वडील गमावलेल्या मुलांना "पीएम केअर फॉर चिल्ड्रन फंड" निधीतून दहा लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. या मुलांना वयाच्या २३ वर्षापर्यंत मासिक स्टायपेंड देण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. याशिवाय आयुष्यमान भारत योजनेतून मुलांना पाच लक्ष रुपयांचा आरोग्य विमा दिला जाणार आहे. त्याचा प्रीमियम देखील पीएम केअर्स फंडातून भरला जाणार आहे.

गोंदिया जिल्ह्यात कोरोनामुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या ५८८ आहे. मृत्यूमुखी पडलेल्यामध्ये जिल्ह्यातील ३०३ मुलांचे आई किंवा वडील गेलेल्याचा समावेश आहे. ११ मुलांचे आई आणि वडील दोघेही या महामारीत मृत्युमुखी पडले आहे. केंद्र शासनासोबत राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांना मिळावा यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहेत. या मुलांना आयुष्यात प्रतिष्ठा आणि संधी देण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याची घोषणा प्रधानमंत्र्यांनी केली होती. त्यानुसार या मुलांच्या शिक्षणाची, आरोग्याची, निवाऱ्याची व्यवस्था शासन करणार आहे. या संदर्भातील सर्व दस्तऐवज आज मुलांना वितरीत करण्यात आले. याशिवाय जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीसह स्नेह प्रमाणपत्र वितरित केले. जिल्हाधिकारी नयना गुंडे यांच्या मार्गदर्शनात महिला व बालकल्याण अधिकारी व जिल्हा बाल संरक्षण कक्षातील अधिकारी-कर्मचारी यांच्या चमूने या कार्यक्रमाचे स्थानिक स्तरावर आयोजन केले होते.

# निर्बंधमुक्तीनंतरही "महाज्योती"; ऑनलाईन प्रशिक्षणासाठीच आग्रही

**नागपूर :** करोना निर्बंध हटल्यानंतरही "महाज्योती'ने नीट आणि जेईई परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना "ऑनलाईन' प्रशिक्षण देण्याचे धोरण कायम ठेवले आहे. २०२४ मधील परीक्षेसाठी राज्यातील १५ हजार मुला-मुलींना प्रशिक्षण देण्याचे लक्ष्य "महाज्योती'ने निश्चित केले आहे.

संपूर्ण देशात करोना निर्बंध मागे घेण्यात आले असून प्रत्यक्ष शिकवणी वर्गाला सुरुवात झाली आहे. जवळपास सर्वच परीक्षा "ऑफलाईन" घेतल्या जात आहेत. मात्र, "महाज्योती"ने चालू सत्रात दहावीची परीक्षा दिलेल्या आणि अकरावी विज्ञान शाखेला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना नीट आणि जेईईच्या "ऑनलाईन" शिकवणीसाठी अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. महाज्योतीतर्फे २०२२ पासून नीट आणि जेईईचे मोफत ऑनलाईन प्रशिक्षण सुरू आहे. २०२४ ची तिसरी तुकडी आहे. यासाठी पंधरा हजार विद्यार्थ्यांना मार्फत ऑनलाईन प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट महाज्योतीने ठेवले आहे. या सर्व विद्यार्थ्यांना, ऑनलाईन प्रशिक्षण, नामांकित कंपनीचा आठ इंची "टॅब" (कायमस्वरूपी) आणि २०२४ ची नीट परीक्षा होईपर्यंत सहा जीबी "इंटरनेट डेटा', या सर्व सुविधा मोफत पुरवण्याचे महाज्योतीने जाहीर केले आहे. तसेच जेईई नीट परीक्षेची आवश्यक सर्व पुस्तकेही विद्यार्थ्यांना मोफत घरपोच दिली जाणार आहेत.

> **राज्यभरातील गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी प्रशिक्षण वर्गाचा लाभ मिळावा हा हेतू यामागे आहे. अकरावी, बारावीचे नियमित वर्ग सुरूअसतानाच हे प्रशिक्षण द्यायचे आहे व सर्व विद्यार्थी शहरात येऊन प्रशिक्षण घेऊ शकत नाही. त्यामुळे "ऑनलाईन" प्रशिक्षणाशिवाय पर्याय नाही.**
> **-प्रा.दिवाकर गमे, संचालक, महाज्योती.**

ऑनलाईन शिकवणी १ जुलै २०२२ पासून सुरूहोणार आहेत. २०२२ च्या मार्च महिन्यातील दहावीच्या परीक्षेत शहरी भागातील विद्यार्थ्याने ७० टक्के तर ग्रामीण, आदिवासीबहुल क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी ६० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांने वर्ग ११ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेऊन, शाळा-महाविद्यालयांच्या प्राचार्याचे "बोनाफाईड सर्टिफिकेट' तसेच ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी प्रवर्गातील जात आणि "नॉन क्रिमिलेयर' प्रमाणपत्रही सादर करणे बंधनकारक आहे.

# पांगोली नदी पुनरूज्जीवनासाठी प्रयत्न करणार, केंद्रीय मंत्री गडकरी




**गोंदिया:** जिल्ह्यातील मुख्य असलेली आणि नागरिकांना जिव्हाळ्याची असलेली पांगोली नदीच्या पुनरुज्जीवनसाठी आपले मंत्रालय सदैव तत्पर असून या नदीच्या पुनरुज्जीवनासाठी आपण पुढाकार घेऊ, असे आश्वासन केंद्रीय जलसंसाधन व नदी विकास मंत्री नितीन गडकरी यांनी दिले.रविवार २९ मे रोजी गोंदिया येथील जिल्हा क्रीडा संकुल परिसरात आयोजित महामार्ग, रस्ते भूमीपूजन कार्यक्रमात नितिन गडकरी यांनी आपल्या भाषणात गोंदिया जिल्ह्यातील नागरिक, शेतकरी व सामाजिक संस्थांची मागणी लक्षात घेता पांगोली नदीचे पुनरूज्जीवन करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही दिली.

यावेळी बोलताना या नदीच्या उगमस्थानापासून ते शेवटच्या टोकापर्यंत नदीपात्राचे विस्तारीकरण आणि साचलेला गाळ काढून तो राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकाम वापरासाठी योग्य असल्यास त्याठिकाणी वापरण्याबाबत आपण आजच संबधितांना निर्देश देत आहोत. फक्त जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी आम्हाला तसे पत्र उपलब्ध करुन द्यावे, असे गडकरी म्हणाले. तसेच खासदार सुनिल मेंढे यांनी आपल्या भाषणातून पांगोली नदी पुनरुज्जीवनाचा विषय मंत्री गडकरी यांच्या निदर्शनास समाजोन्नती बहु. ग्रामीण व शहरी संस्था व पांगोली नदी वाचवा अभियान कृती समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणून दिला.

# पी.डी.राहांगडाले विद्यालयाचा माजी विद्यार्थी नितीश युपीएसी परिक्षेत उत्तीर्ण



**गोरेगाव:** येथील पी.डी.राहांगडाले विद्यालयाचा माजी विद्यार्थी नितीश दिलीपकुमार डोमळे यांने युपीएससी परीक्षेच्या जाहिर झालेल्या निकालात ५५९ रँक प्राप्त करीत यश संपादन केले आहे.नितीशची निवड आयएएस/आयपीएस करीता होणार आहे.

नितीशचे आई वडील दोन्ही शिक्षक आहेत. वडील पी.डी.राहांगडाले विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक आहेत. त्यानी आपल्या यशाचे श्रेय आई वडील व विद्यालयातील मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांना दिले आहे. नितिशने मिळवलेल्या यशाने ग्रामीण भागात शिक्षण घेतलेले विद्यार्थी सुद्धा जिद्द आणि कठीण परीश्रमातून देशाच्या सर्वोच्च परीक्षेत यश संपादन करू शकतात हे सिध्द केले आहे. विद्यालयाचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व सर्व शिक्षकांनी नितीशचे घरी जाऊन अभीनंदन केले असून तालुक्यात त्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# बांधकाम विभागात नियमबाह्य पदोन्नती



**गोंदिया:** जिल्हा परिषदेत सध्या सार्वत्रिक बदल्या सुरु आहेत. याअंतर्गत बांधकाम विभागात करण्यात आलेल्या पदोन्नतीप्रकरणी मोठ्या प्रमाणात अनियमितता दिसून येत असून आपल्यावर अन्याय झाला असल्याची ओरड कर्मचाऱ्यांत आहे.कनिष्ठ लिपिकांच्या पदोन्नतीतही बांधकाम विभागासाठीच काही अडून बसल्याची चर्चा आहे.

जिल्हा परिषद गोंदिया नेहमी ह्या ना त्या कारणामुळे चर्चेत राहते. असेच एक प्रकरण सार्वजनिक बांधकाम विभागात घडले आहे. जिल्ह्यातील ८ पंचायत समिती कार्यालयात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गातील एकूण २४ पदे कार्यरत आहेत. त्यापैकी १० स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना अटी व शर्तीच्या अधिन राहून पदोन्नती देण्याची कारवाई जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे. परंतु सदर पदोन्नती प्रक्रियेत अटी शर्तीच्या अधिन राहून पदोन्नती देताना आयुक्तांची मान्यता घेणे आवश्यक असून जे कर्मचारी पदोन्नतीकरिता पात्र आहेत व ज्यांनी एप्रिल २०२२ ला विभागाकडून घेण्यात येत असलेली व्यावसायिक परीक्षा व विभागीय परीक्षा दिलेली आहे. अशा कर्मचारी यांनी विचारात घेणे गरजेचे होते. मात्र जिल्हा परिषदेने आयुक्तांची लेखी परवानगी न घेता नियमबाह्य पद्धतीने पदोन्नती देण्यात येत आहे.

नियमबाह्यरित्या देण्यात येणारी पदोन्नती थांबवून रिक्त राहणाऱ्या जागा भरू नये, अशू मागणी कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली आहे.

# ओबीसींना आरक्षण मिळालेच पाहिजे, आयोगापुढे मागण्या व निवेदने समर्पित



**गोंदिया:** ओबीसी समाजाला लोकसंख्येनुसार आरक्षण मिळालेच पाहिजे, अशी आग्रही मागणी ओबीसी समाजासह विविध सामाजिक संघटनांनी शनिवारी समर्पित आयोगामोर लावून धरली. यावेळी गोंदिया, भंडारा, नागपूर, चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली या सहा जिल्ह्यातील ११५ संघटनांच्या प्रतिनिधी, राजकीय पक्ष आणि नागरिकांनी आयोगाची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करुन आपली भूमिका स्पष्ट केली.गोंदिया जिल्ह्यातून ओबीसी अधिकार मंच व गोंदिया जिल्हा ओबीसी संघटनेच्या नावे खेमेंद्र कटरे यांनी निवेदन सादर केले.

जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायती तसेच महानगरपालिका, नगरपालिका आणि नगर पंचायंती या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांच्या मागास प्रवर्गात (इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती) आरक्षण देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र शासनाने समर्पित आयोग स्थापन केला आहे.

समर्पित आयोगाचे अध्यक्ष माजी मुख्य सचिव जयंत कुमार बांठिया, सदस्य सचिव पंकज कुमार, आयोगाचे सदस्य डॉ. नरेश गिते, माजी प्रधान सचिव ह.बा. पटेल, माजी प्रधान सचिव महेश झगडे, विभागीय आयुक्त माधवी खोडे, टाटा सामाजिक विज्ञान संस्था मुंबईचे असोसिएट प्रोफेसर डॉ. शैलेशकुमार दारोकार हे या समर्पित आयोगाचे सदस्य आहेत.

ओबीसींच्या स्थायी आरक्षणासाठी संविधानात संशोधन करा अशी भूमिका ओबीसी अधिकार मंच व गोंदिया जिल्हा ओबीसी संघटनेच्यावतीने खेमेंद्र कटरे, स्टुडंटस राईटस असो.च्यावतीने उमेश कोरांम, नागपूर पवांर कृती समाजसंघटनेच्यावतीने मनोज चव्हाण, ओबीसी युवा अधिकार मंचचे निकेश पिने, पियुष आकरे, मनिष गिरडकर, कुलदिप सोनकुसरे, कृतल आकरे, प्राचार्य विठ्ठल निकुले यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने आयोगाची भेट घेऊन स्पष्ट केली.



५० टक्के मर्यादित राहून ओबीसी समाजाला लोकसंख्यानिहाय आरक्षण देण्यात यावे. ओबीसींना स्थायी स्वरूपाचे आरक्षण मिळावे यासाठी संविधानाच्या २४३ डी आणि २४३ टी मध्ये सुधारणा करण्यासाठी केंद्र सरकारने विधेयक आणावे. २०११ ला ओबीसी समाजाचा डाटा केंद्राचे उपलब्ध केला आहे. त्या माहितीतील समर्पित आयोगाने जमा केलेला डेटा गृहित धरावा, अशी मागणी केली.

## महात्मा फुले समता परीषदेचे समर्पित ओबीसी आयोगाला निवेदन!



**नागपूर:** महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने समर्पित आयोगाला महाज्योतीचे संचालक व समता परिषदेचे उपाध्यक्ष दिवाकर गमे यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले. त्यावेळी ग्रामपंचायत पातळीवरुन,स्थानिक स्वराज्य पातळीवरुन, हा इंपेरिकल डेटा जमा करण्याची गरज आहे, ओबीसी साठीच निर्माण झालेली महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असलेली, महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था महाज्योती ही संस्था, त्यांना आयोग किंवा महाराष्ट्र शासनाकडुन उचित निर्देश मिळाल्यास हे काम करण्यास समर्थ आहे. याच महाज्योतीचा एक संचालक म्हणुन, या राज्य मागास आयोगाने, राज्य शासनाला शिफारस करून, जर ग्रामपंचायत पातळीपासुन, तर स्थानिक स्वराज्य संस्थांपर्यंत, ओबीसींचा इंपेरिकल डेटा जमा करण्यास महाज्योतीला निर्देश दिलेत, तर अल्पावधीत, महाज्योती या आयोगाला, त्यांच्या मागणीप्रमाणे हा डेटा ,याच आयोगाच्या मार्गदर्शनाखाली,तयार करून देईल, असे ही आयोगासमोर, महाज्योतीचे संचालक प्रा. दिवाकर गमे यांनी सांगितले.

या आयोगाला निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात, महात्मा फुले समता परीषदेचे उपाध्यक्ष, प्रा. दिवाकर गमे, नागपुर जिल्हा संघटक मनोज गणोरकर, नागपुर महानगर कार्याध्यक्ष आरिफ काझी, महानगर संघटक मिलींद पाचपोर, नागपुर जिल्हा महिला अध्यक्ष विद्या बहेकर, वर्धा जिल्हा महिला अध्यक्ष कविता मुंगळे, नागपुर महिला कार्याध्यक्ष निशाताई मुंडे, वर्धा जिल्हा कार्याध्यक्ष विशाल हजारे,विजय डोंगरे, सचिन मोहोड,योगेश ठाकरे, विक्रमजी राऊत, भुदेवजी बांडे,महादेवजी तलमले, जयश्री मोर्देकर, मोरादजी आढावु, आणि बहुसंख्य महात्मा फुले समता परीषदेचे कार्यकर्ते उपस्थित होते.



## ओबीसी सेवा संघ, ओबीसी जनगणना परिषदेनेही दिले आयोगाला निवेदन

**भंडारा:-** ओबीसींच्या राजकीय आरक्षणासाठी इम्पेरिकल डेटा गोळा करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या मागासवगीयांच्या समर्पित आयोगाने नागपूर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात विदर्भातील ओबीसी संघटना व संघटनापदाधिकारीसोबत भेट घेत चर्चा केली. या आयोगासमोर ओबीसी सेवा संघ भंडारा, ओबीसी महिला संघ भंडारा, ओबीसी जनगणना परिषद भंडाराच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून आपले म्हणने मांडून निवेदन सादर केले. यावेळी सदानंद ईलमे मुख्य समन्वयक, गोपाल सेलोकर अध्यक्ष, मंगलाताई वाडिभस्मे महाराष्ट्र अध्यक्षा, ईश्वर निकुळे कार्याध्यक्ष भंडारा, डॉ बाळकृष्ण सार्वे, श्रीकृष्ण पडोळे, रमेश शहारे, गोपाल देशमुख, मुरलीधर भर्रे, वामन गोंधुळे, सुधाकर मोथलकर, शालिक कुकडे, बाळासाहेब गावंडे, भवसागर साहेब, प्रमिला डोरले, वृंदा गायधनी उपस्थित होते. आयोगासमोर साक्ष देतांना ओबीसी आरक्षण कसे आवश्यक आहे हे पटवून देण्यात आले. राजकिय आरक्षणासह शैक्षणिक व नोकरितील आरक्षण, शिष्यवृत्ती, होस्टेल, जातिनिहाय जनगणना इत्यादी बाबतीत चर्चा करण्यात आली.

## संघर्ष वाहिनीने नोंदवला निषेध

संघर्ष वाहिनीने यावेळी आयोगाची भेट घेतली व आपला निषेध नोंदवला. वाहिनीचे संयोजक दीनानाथ वाघमारे आणि मुकुंद अडेवार यांनी सांगितले की, आयोगाने मते जाणून घेणे ही धूळफेक आहे. आयोगाचे काम आरक्षण कसे मिळेल हे पाहायचे आहे ते होत नाही आहे. त्यामुळे आम्ही त्यांचा निषेध करतो. परंतु आयोगाला भेटून आम्ही आमची भूमिकाही स्पष्ट केली आहे. आमचे म्हणने आहे की, ओबीसीला लोकसंख्येप्रमाणे आरक्षण मिळावे ५० टक्केची अट नको. यावेळी किशोर सायगन, अनिल राऊत, अर्चना कोट्टेवार, अश्विनि नागुलवार, राजेंद्र बढिये, धर्मपाल शेंडे, राजु चव्हाण, किशोर वर्‍हाडे,अण्णाजी राऊत, गजेंद्र साखरे व हिरामण साखरे आदी उपस्थित होते.



## आयोगाला भेटण्यापुर्वी संविधान चौकात संघटनांनी नोंदविला निषेध




भारतीय शोषित पिछडा वर्ग व ओबीसी जनमोर्चाचे उपाध्यक्ष प्रा. रमेश पिसे यांनी आयोगाला निवेदन सादर करुन ओबीसी जनगणनेशिवाय पर्याय नसल्याचे सांगितले. तसेच राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने यावेळी आयोगाची भेट घेऊन आपली





भूमिका स्पष्ट केली. ५० टक्के मर्यादित राहून ओबीसी समाजाला लोकसंख्यानिहाय आरक्षण देण्यात यावे. ओबीसींना स्थायी स्वरूपाचे आरक्षण मिळावे यासाठी संविधानाच्या २४३ डी आणि २४३ टी मध्ये सुधारणा करण्यासाठी केंद्र सरकारने विधेयक आणावे अशी मागणी केली. यावेळी सचिन राजुरकर, शेषराव येलेकर, शरद वानखेडे, सुषमा भड, राजेश राहाडे, वृंदा ठाकरे आदिंसह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

## गडचिरोली जिल्ह्यातील ओबीसी आरक्षणाच्या स्थितीबाबत ओबीसी समर्पित आयोगाला निवेदन-खा.अशोकजी नेते



**गडचिरोली :-** महाराष्ट्र सरकारतर्फे नियुक्त केलेले समर्पित ओबीसी आयोगाचे अध्यक्ष जयंत बंटीया यांच्या समक्ष नागपूर येथे गडचिरोली जिल्ह्याच्या ओबीसी समाजाच्या समर्पित आयोगाची माहिती खा. अशोक नेते यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले.

गडचिरोली जिल्ह्या हा आदिवासी बहुल असूनही ओबीसींची संख्या सांख्यिकी विभागाच्या माहितीप्रमाणे ४४ % टक्के आहे. त्यात गडचिरोली जिल्ह्यातील बहुसंख्य ओबीसी हा शेतकरी, शेतमजूर आहे. शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी आहे, राजकीय दृष्ट्या अक्षम आहे. त्यात सामाजिक, आर्थिक, स्थिती हलाखीची आहे. शैक्षणिक स्थिती कमकुवत आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील गेल्या २० वीस वर्षांपासून १९% टक्के असणारे आरक्षण हे ६ % टक्के असल्याने जवळपास नौकरी भरती ०% शून्य टक्क्यांवर आहे. त्यामुळें ओबीसी समाजात प्रचंड रोष निर्माण झालेला आहे. तसेच नुकत्याच झालेल्या सर्वोच्च न्यायालयाचा निकालावरून ओबीसीचे राजकीय आरक्षण गेल्याने राजकीय आरक्षणात कवडीचेही स्थान नाही. राज्य सरकारच्या नाकर्त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेचे राजकीय आरक्षण गेले. त्यामुळे गडचिरोली जिल्ह्यात राज्य सरकारविरोधात तीव्र असंतोष आहे. तरी स्थानिक स्वराज्य संस्थेत राजकीय आरक्षण २७ % टक्के व स्थानिक वर्ग ३ व ४ % टक्के च्या नोकरीत पद भरतीत आरक्षण १९% टक्के पूर्ववत करावे.

यासाठी विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर येथे ओबीसी समर्पित आयोगाला गडचिरोली जिल्ह्याच्या ओबीसी समाजाच्या आरक्षणाच्या स्थितीबाबत खा.अशोक नेते यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले. याप्रसंगी बाबुराव कोहळे प्रमोद पिपरे, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष सुनील पारधी, ओबीसी संघटक प्रकाश बगमारे, माजी नगराध्यक्ष सौ. योगीताताई पिपरे, भाष्कर बुरे, यांचे सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.